**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# बदल

**‘**बदल**’** हा जगाचा स्थायीभाव आहे. आहे त्या परिस्थितीत बदल झाले नसते तर आजचे जग आकाराला आले नसते. काळानुसार होणा-या बदलांना सामोरे जाऊन बदल पचवतो, मान्य करतो तोच टिकतो. **‘**सर्व्हायवल ऑफ द फिटेस्ट**’** म्हणताना उत्क्रांतिवादाचा जनक डार्विन याने हेच सूचित केले आहे. स्वतःमध्ये असे बदल घडवून आणूनच निसर्गातील अनेक प्रजातींनी आपले अस्तित्व टिकविले आहे. उत्क्रांत झालेल्या माणसाने देखील अनेक बदल पचवले म्हणून आज तो टिकला. हे बदल स्वीकारत, त्यापासून बोध घेत घेतच माणसाची बुद्धिमत्ता वाढली. बुद्धिमत्ता वाढल्याने माणसाची आकलनक्षमता, विचारक्षमता वाढली आणि या दोहोंमुळे पुन्हा त्याची बुद्धी वाढली. या बुद्धिमान माणसाने अनेकानेक प्रकारचे संशोधन करून आपल्या दैनंदिन जीवनांत अनेक प्रकारचे बदल घडवून आणले. म्हणूनच आज ज्ञानाचे, विज्ञान-तंत्रज्ञानाचे युग आपल्यासमोर सिद्ध झाले आहे. या नवसंशोधनांच्या मदतीने माणसाने आपल्या बुद्धिमत्तेचेही संशोधन केले. त्यातून निसर्गाकडून मिळालेल्या या बुद्धिमत्तेवर सभोवतालच्या वातावरणाचा परिणाम घडून येतो असेही आता दिसून येत आहे. म्हणजे माणसाची बुद्धिमत्ता पुनःपुन्हा बदलांना सामोरी जात आहेच. विज्ञान-तंत्रज्ञानात तर बदलांना अधिकच महत्त्व प्राप्त होते. काही ना काही बदल होत जुने तंत्रज्ञान कालबाह्य होत जाते हे तर आपण बघतोच आहोत. कॅसेट, सीडी, एमपी-३ आणि आयपॉड यांद्वारे संगीताचा आनंद घेणारे आपण सर्व आणि विशेषतः तरुण पिढी आजोबा-पणजोबांच्या काळातील गाण्यांच्या गोल तबकड्या केव्हाच विसरलो आहोत. तसेच मोबाइल फोन आला आणि पेजर हद्दपार झाला. इंटरनेट या नवतंत्राने जग आपल्या हाताशी आणून ठेवले. दैनंदिन व्यवहारांतील हे सर्व तंत्रज्ञानयुक्त बदल पचविणा-या माणसाची मानसिकता काही बाबतीत बदलते आहे तर काही बाबतीत नाही. परंतु, हा बदल केवळ वरकरणीच आहे का, असा प्रश्न पडावा, अशाही काही घटना सभोवताली घडताना आज दिसतात. विज्ञानाचा प्रसार झाला हे खरे. पण म्हणून वैज्ञानिक दृष्टी समाजात दृढमूल झाली का, या प्रश्नाचे निरपवाद उत्तर ‘होय’ असेच येईल याची खात्री नाही. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रसाराबरोबरच धर्माचरणाचाही पगडा वाढत असल्याचा सर्वत्र अनुभव येतो आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या या युगात धर्मविषयक बाबींना आजही अनेकदा पूर्वीइतकेच महत्त्व देशोदेशी मिळताना दिसते. साम्यवादी चीनमध्येही धर्म आहे आणि साम्यवादी रशियातही. भांडवलशाहीला महत्त्व देणा-या अमेरिकेतही तो आहेच आणि या दोहोंच्या मध्ये असलेल्या भारतातही. माणसाने **‘**माणूस**’** बनावे ही धर्माची शिकवण माणूस विसरला आहे की काय अशी शंका वाटावी असे अनेक विषय आज अवतीभोवती दिसतात. कोणी वंशभेदाच्या पलीकडे जाण्यास तयार नसतात तर कोणी जातिभेदाच्या. धर्मभेद, वंशभेद, वर्णभेद, जातिभेद संपले असे म्हटले जात असले तरी जगातून हे भेद संपलेले नाहीत. या भेदांत गुरफटलेला माणूस अंतर्बाह्य बदलतो आहे, असे म्हणणे म्हणूनच धाडसाचे ठरेल. जसा माणूस तशीच त्याने तयार केलेली व्यवस्था. त्यामुळे, मुळात माणूस बदलत नाही तोवर व्यवस्थेमध्ये बदल संभवत नाही. प्रचलित व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्याच्या शक्यता पुन्हा माणसाच्या इच्छाशक्तीवरच निर्भर असतात. त्या सुधारणांची वा बदलांची दिशा काय असावी, याचा शोध घेण्यासाठी स्वतःच्या सदसद्विवेकाला कौल लावण्याखेरीज माणसाला पर्याय नाही. मानसिकता बदलण्याची प्रक्रिया तिथे सुरू होईल. मानसिकतेतील हा बदल तंत्रज्ञानामुळे घडून येणारा नाही. या सा-या गुंत्याचाच वेध घेण्याचा प्रयत्न पुढील पानांत केला आहे. ■■

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

धर्म-संस्कृती

# रशिया पुन्हा ‘ऑर्थडॉक्स चर्च’कडे....

चंद्रावर पाऊल ठेवलेल्या, अण्वस्त्रांची निर्मिती केलेल्या आणि साम्यवादाची कास धरलेल्या रशियाची वाटचाल चालू शतकात वेगळ्या दिशेकडे होऊ लागली आहे. तेथील नागरिकांचा ख्रिस्ती धर्माकडे असलेला ओढा वाढू लागला आहे. त्यांच्या दैनंदिन व्यवहारांत धर्माला महत्त्व मिळू लागले आहे. सोव्हिएत रशियाच्या विघटनापूर्वीच्या काळात पिछाडीवर पडलेले ‘ऑर्थडॉक्स चर्च’ पुन्हा एकदा नव्या दिमाखात आपले अस्तित्व जाणवून देत आहे. ख्रिस्ती धर्मात शतकांपूर्वी ‘ऑर्थडॉक्स’ व ‘प्रॉटेस्टंट’ असे दोन गट पडले, तेव्हा रशियात ‘ऑर्थडॉक्स’ गटाचे प्राबल्य होते. त्यामुळे रशियातील धर्मविषयक घडामोडींबाबत चर्चा करताना ‘ऑर्थडॉक्स चर्च’ असा शब्दप्रयोग साधारणतः करण्यात येतो. सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर झालेले रशियाचे अध्यक्ष बोरिस येलत्सिन व व्लादिमिर पुतीन आणि विद्यमान अध्यक्ष दिमित्री मेदवेदेव यांनी वेळोवेळी चर्चमध्ये हजेरी लावली आहे. तसेच चर्चचे पदाधिकारी सरकारी कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहिले आहेत. यामुळे परदेशांत भुवया उंचावल्या गेल्या असून रशियातील ‘ऑर्थडॉक्स चर्च’ आणि ‘क्रेमलिन’ (राजकीय सत्तास्थान) हे दोन घटक एकत्र येऊन ‘रशियातील (नवी) एकसत्ताक राज्यपद्धती’ (रशियन ऑटोक्रसी) उदयास आणण्याच्या प्रयत्नांत आहेत किंवा कसे, अशी चर्चा आंतरराष्ट्रीय राजकारणात अलीकडे होऊ लागली आहे. रशियातील चर्चने अर्थातच ही बाब फेटाळली आहे. सरकार आणि चर्च यांच्यात मतभेदाचे अनेक मुद्दे आहेत, अशी पुष्टीही चर्चने जोडली आहे. पण रशियातील हे दोन महत्त्वाचे घटक एकत्र आले तर चालू शतकात रशियाची स्वतंत्र व नवीन ओळख निर्माण होईल, असेही मत जाणकार मांडतात.

**चर्चच्या इतिहासाकडे...**

चालू शतकात रशियातील चर्चचे एकप्रकारे पुनरुज्जीवन होत असले तरी तसे पाहता रशियातील चर्चचा इतिहास काही शतकांचा आहे. राजेशाही असताना Kievan Rus येथील राजकुमार व्लादिमिर याच्या काळात (इसवी सन ९८८) रशियात ख्रिस्ती धर्माचा प्रवेश झाला. या राजपुत्राने त्या काळी प्रचलित असलेल्या



पागन संस्कृतीचा शोध घेण्यासाठी काही राजदूतांना परदेशी धाडले होते. यांतील जे ग्रीसमध्ये गेले ते ग्रीकांच्या चालीरीतींनी प्रभावित झाले. मग राजकुमार व्लादिमिरने ग्रीकांकडून ख्रिस्ती धर्म आयात केला. त्याने आपल्या देशातील नागरिकांना बाप्तिस्मा घेण्याचाही आदेश दिला होता. ख्रिस्ती धर्माच्या प्रवेशाची अशी कहाणी रशियात सांगितली जाते. या नंतरच्या काळात गावोगावी चर्च उभे राहिले. रशियातील तत्कालीन समाजजीवनाचा ख्रिस्ती धर्मावर व ख्रिस्ती धर्माचा तेथील समाजजीवनावर प्रभाव पडला. हा प्रभाव इतका होता की ‘ऑर्थडॉक्स चर्च’ हे आध्यात्मिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि काही प्रमाणात राष्ट्र-रक्षक अशा चर्चांच्या संदर्भात एक महत्त्वाचे केंद्र ठरू लागले. धर्मगुरुंचे समाजातील मानाचे स्थान, त्यांचा पोषाख, त्यांच्या सायंप्रार्थना इत्यादी बाबी सामान्यांसाठी औत्सुक्याच्या ठरू लागल्या.

विविध कालखंडांत झालेल्या राजांनी धर्मप्रसाराला केलेली मदत व धर्मप्रसारार्थ आयुष्य वेचणारे नागरिक यांमुळे रशियात त्या काळी धर्माने भारलेले वातावरण होते, असे मत काही अभ्यासक नोंदवतात. आध्यात्मिकतेचे महत्त्व वाढल्याने या काळात रशियाचे Holy Russia असे चित्र साकारले, असे म्हटले जाते. त्या नंतरची काही शतके हे चित्र टिकून होते. धर्मसत्तेचा प्रभाव राजसत्तेवर असावा, असेही प्रयत्न या काळात झाले. त्यामुळे तत्कालीन धर्मोपदेशक व राजे यांच्यात काही वेळा संघर्षही झाला. अनेक वर्षे राजसत्तेनेही धर्मसत्तेला आपल्या अंकित ठेवले होते. तेव्हा राजा हा धर्मसत्तेचा चर्चचा प्रमुख होता व धर्मोपदेशकांच्या नेमणुका व इतर दैनंदिन निर्णयही राजाच्या संमतीनेच पार पाडले जात. धर्मसत्ता ही राजसत्तेची जणू बटिक बनल्याने साम्यवादी नागरिकांची धर्मसत्तेवर नाराजी होती. म्हणून सोव्हिएत रशियात साम्यवाद रुजल्यानंतर चर्चची पीछेहाट झाली, असे म्हटले जाते. साम्यवादी राजवटीने धर्मसत्ता नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न केला होता.

सोव्हिएत रशियाचे विघटन झाल्यानंतर व रशिया साम्यवादापासून थोडा दूर होऊ लागल्यावर चर्चचे महत्त्व पुन्हा हळूहळू वाढू लागले. विसाव्या शतकाच्या मध्यापासून २००८पर्यंत म्हणजे सुमारे अर्धशतकाच्या काळात रशियातील एक धर्मगुरु Patriarch Alexy II (१९२९-२००८) यांनी सुमारे ४० वर्षे धर्मगुरुपदाची जबाबदारी सांभाळली. साम्यवादी राजवटीत ख्रिस्ती धर्म उतरतीला लागला होता आणि जणू काही फक्त एक पंथ व त्या पंथाचे अनुयायी अशी त्याची ओळख उरली होती. त्या काळात, धर्मसमर्थकांना दबाव व मानसिक छळ इत्यादींना सामोरे जावे लागले. त्या

काळात केवळ चर्चचे कार्य चालू ठेवण्यासाठी Alexy यांनी शासन व शासकीय यंत्रणांसोबत तडजोडीचे धोरण स्वीकारले होते, स्टालिनच्या काळात धर्मकार्याशी संबंधित सुमारे २० हजार नागरिकांची हत्या करण्यात आल्याचे म्हटले जाते. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एक विशिष्ट दिवस राखून ठेवण्यासाठी Alexy प्रयत्नशील होते. रशियातील 'ऑर्थडॉक्स चर्च'ला एक हजार वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तेथे १९८८ मध्ये कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. धर्मकार्य करू इच्छिणा-या सुमारे १६०० संस्थांची नोंदणी त्या वर्षी झाली. सरकारच्या हस्तक्षेपाशिवाय धर्मोपदेशक बनण्याचा मान रशियातील क्रांतीनंतर Alexy यांना १९९० मध्ये मिळाला होता. या नंतरच्या काळात धर्मविषयक कायद्यात बदल होऊन नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य देण्याकडे रशियाने वाटचाल केली.

**चालू शतकात....**

रशियातील घटनेच्या (१९९३मधील) २८ व्या कलमानुसार रशियातील प्रत्येक नागरिकाला कोणत्याही धर्माचे पालन करण्याचा, त्याचा प्रचार-प्रसार करण्याचा अधिकार आहे. या शिवाय रशिया हा 'सेक्युलर देश' असल्याचे रशियाने १९९७मध्ये स्पष्ट केले आहे. धार्मिक संघटना व राज्यशासन यांच्यात कोणताही संबंध नसून धार्मिक संस्था/संघटना या कायद्यासमोर समान आहेत, असेही नमूद करण्यात आले आहे. यामुळे अलीकडच्या काळात रशियातील नागरिकांचा 'ऑर्थडॉक्स चर्च'कडील ओढा वाढू लागला आहे. अनेक नागरिक 'बाप्तिस्मा' करून घेत आहेत. असे विधी करून घेणे ही कधीकधी औपचारिकता ठरते. कारण, त्या मागील अर्थपूर्णता वा गांभीर्य त्यांनी समजून घेतले असतेच असे नाही. पण, रशियातील साम्यवादी राजवटीने पुसलेली आपली धार्मिक-सांस्कृतिक ओळख नव्याने प्रस्थापित करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो, असे अभ्यासक म्हणतात. धार्मिक-सांस्कृतिक इतिहासाशी नाळ जोडण्याचाही हा प्रयत्न आहे, असेही मत मांडले जाते. १९९१च्या तुलनेत २००४मध्ये 'ऑर्थडॉक्स चर्च'कडे झुकणा-या नागरिकांची संख्या सुमारे तिपटीने वाढल्याचे अभ्यासक म्हणतात.

'ऑर्थडॉक्स चर्च'चे पुनरुज्जीवन होत असल्याने रशियातील अनेक चर्च आता कात टाकत आहेत. एकेकाळी या चर्चच्या इमारतींना गोदामाचे स्वरूप आले होते, तर कुठे छोटे कारखाने उभे राहिले होते. आता या इमारतींचा वापर मूळच्या धार्मिक कार्यासाठी होऊ लागला आहे.



गोर्बाचेव्ह यांच्या पेरेस्त्रोइकाच्या काळात चर्चची संख्या दोन हजार होती, ती आता २००८मध्ये तेरा हजारापर्यंत वाढली आहे. माहिती-तंत्रज्ञानातील बदलांचा उपयोग करून घेण्यासाठी 'ऑर्थडॉक्स चर्च' पुढे सरसावले आहे. धार्मिक साहित्याची बाजारपेठ विस्तारू लागली आहे. नवनवी वृत्तपत्रे, मासिके जागोजागी दिसू लागली आहेत. या बरोबरच धार्मिक घडामोडींची माहिती देणा-या नव्या वेबसाइट्स्‌ही चालू झाल्या आहेत. असे असले तरी केवळ बाप्तिस्मा करण्याने धार्मिकता वाढते असे नाही, त्यासाठी आचारधर्मही तसा असायला हवा असे मतही मांडले जाते. चर्चमध्ये येणा-या व्यक्तींची नोंदवही नसल्याने चर्चला नियमित भेट देणा-या नागरिकांच्या संख्येबाबत तपशील उपलब्ध होत नाही. रशियातील सुमारे साठ टक्के नागरिक आपण 'ऑर्थडॉक्स चर्च'शी संबंधित आहोत असे म्हणतात. त्यांपैकी साधारणपणे महिन्यातून एकदा चर्चला भेट देणा-यांची संख्या एक वा दोन टक्के असावी, असे काही म्हणतात. तर, ती किमान दहा टक्के असावी, असाही अंदाज काही मांडतात. चर्चच्या माध्यमातून सामाजिक कार्य करण्याचाही प्रयत्न काही प्रमाणात होतो आहे, पण या कामी सरकार चर्चला मदत करीत नाही, असा काहींचा अनुभव आहे.

'ऑर्थडॉक्स चर्च'चे वाढते प्रस्थ काहींना चिंताजनक वाटते. चर्चच्या या होत असलेल्या पुनरुत्थानाबाबत रशियातच वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. हे चर्च पुन्हा एकदा शासनाच्या दावणीला बांधले जाईल व राजसत्तेची एकाधिकारशाही अवतरेल असे काहींना वाटते. तर, काहींना ही बाब काळजीची वाटत नाही. रशियात लोकशाही रुजण्यासाठी व त्या दृष्टीने नागरी समाजाच्या जडणघडणीसाठी 'ऑर्थडॉक्स चर्च'चा उपयोग होऊ शकेल, असे त्यांना वाटते. त्यामुळे रशियातील 'ऑर्थडॉक्स चर्च' कोणती दिशा पकडेल, यावर रशियाचे भवितव्य अवलंबून असल्याचे मत काही अभ्यासक मांडतात. नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य देतानाच राज्यशासन व धर्मसत्ता (ऑर्थडॉक्स चर्च) या दोन बाबी वेगळ्या असल्याचे रशियाच्या घटनेने स्पष्ट केले आहे. तथापि, रशियातील राजकीय नेते 'ऑर्थडॉक्स चर्च'ला काही प्रमाणात महत्त्व देत आहेत, असे अनेकांना वाटते. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय राजकारणात रशिया आपली नवीन ओळख प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांत आहे का, अशी शंका काहींना वाटते.

आजच्या विज्ञानयुगात समाजजीवनांत धर्माचा प्रभाव असावा की नसावा हा विषय नेहमीच वाद-चर्चेचा ठरत असला तरी समाजजीवनांतील धर्माचे महत्त्व कमी झालेले नाही, असे रशियातील घडामोडींवरून दिसून येते. ■■

विज्ञान-संशोधन

# वंश व बुद्धिमत्ता

विज्ञान-संशोधनाने मानवाचे जीवन सुखकारक केले आहे याबद्दल दुमत नसावे. नवनवीन संशोधनांची व्यवहारांतील उपयुक्तता लक्षात घेऊन विविध विषयांत अधिकाधिक सखोल संशोधने करण्यास संशोधक प्रेरित होतात. अशा वेळी विज्ञान-संशोधनाचे अधिकाधिक फायदे मिळविण्याच्या प्रयत्नांत कधीकधी निसर्गात हस्तक्षेपही होऊ शकतो. सखोल संशोधन करूनही कधी काही बाबींचे नेमके उत्तर हाती येईलच असे नाही. तर कधी त्याद्वारे काही अप्रिय बाबीही पुढे येऊ शकतात. अशा अप्रिय बाबींचा दुरुपयोग समाजातील कोणत्याही घटकांकडून होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून, एखाद्या विषयात झाले एवढे संशोधन पुरे, असे म्हणून संशोधकांनी संशोधन थांबवणे उचित ठरेल का ? किंवा, असे संशोधन व्हावे पण त्याद्वारे हाती आलेली माहिती वा निष्कर्ष फक्त संशोधकांपुरतेच मर्यादित असावेत का ? चालू शतकात वंश व बुद्धिमत्ताविषयक संशोधन चर्चेच्या नेमक्या या टप्प्यावर पोहचले आहे. संशोधकांच्या एका गटाच्या मते असे संशोधन समाजहिताचे ठरते असे नाही, त्यामुळे ते करू नये असे या गटाला वाटते. तर, दुस-या गटाला असे वाटते की वैज्ञानिक सत्य न शोधणे वा दडवणे योग्य नाही, त्याबाबतचे संशोधन करून ते जनतेपुढे मांडणे गैर नाही.

वंश आणि बुद्धिमत्ता यांच्यातील परस्परसंबंध हा विषय अमेरिकेत १९६९पासून संशोधकांच्या चर्चेत आला. अमेरिकेतील आफ्रिकी वंशाच्या नागरिकांनी सुरू केलेल्या नागरी हक्क चळवळीची पार्श्वभूमी या चर्चेला होती. प्रामुख्याने आफ्रिकी वंशाच्या नागरिकांबाबत हा विषय तेव्हा अधिक प्रकर्षाने पुढे आला होता. 'बुद्धिमत्ता वाढवून शैक्षणिक प्रगतीचा आलेख किती प्रमाणात उंचावणे शक्य होऊ शकते', या विषयावर ए. आर. जेन्सन यांचा एक प्रदीर्घ लेख 'हार्वर्ड एज्युकेशन रिव्ह्यू'ने १९६९मधील एका अंकात प्रसिद्ध केला होता. आफ्रिकी वंशाच्या मुलांच्या बुद्ध्यांकांतील (IQ) कमतरता ही केवळ ते वंचित राहिल्यामुळेच नसून ती आनुवंशिक आहे, असे प्रतिपादन या लेखात करण्यात आले होते. तसेच बुद्धिमत्तेच्या संदर्भात लिंगभेदाचा



मुद्दाही पुढे आला होता. १९७०च्या दशकात चालू झालेल्या स्त्रीवादी चळवळींना प्रत्युत्तर म्हणून स्टीव्हन गोल्डबर्ग यांचा The Inevitability of Patriarchy असा लेख प्रसिद्ध झाला होता. यशाचे जे काही मोजमाप समाज करतो त्यात पुरुष स्वाभाविकपणे यशस्वी होतात आणि यामागे त्यांची शारीरिक जडणघडण कारणीभूत असते, असे त्यांनी या लेखात म्हटले होते.

**संशोधन समाजहिताचे नाही**

हे संशोधन करू नये असे मत मांडणारा गट काही मुद्दे पुढे आणतो. मज्जाशास्त्रज्ञ स्टीवन रोस यांनी या संदर्भात मते मांडली आहेत. त्यांच्या मते, कोणत्याही दोन गटांतील भेद जाणून घेण्यासाठी विचारात घेतलेल्या वर्गवारीमध्ये सातत्य असते असेही नाही, त्यात एक प्रकारची अस्थिरता असू शकते. कारण त्या वर्गवारीला त्या काळचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संदर्भ असतो व हा संदर्भ काळानुरुप बदलता असतो, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. ब्रिटनमधील वेल्स परगण्याचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग असून दोन्ही भागांतील नागरिकांमध्ये जनुकीय भेद आढळतात. पण या दोन गटांमध्ये बुद्धिमत्तेबाबतचे संशोधन व्हावे, असा आग्रह संशोधकांकडून वा समाजातील इतर घटकांकडून धरला जात नाही. त्यामुळे काही विशिष्ट गटांबाबत (प्रामुख्याने आफ्रिकी) अशा प्रकारच्या संशोधनाचा आग्रह काही घटकांकडून केला जातो, तेव्हा त्या मागचा हेतू काय आहे हे समजून घेणे गरजेचे ठरते. अशा संशोधनाचा पाया बळकट असेल, ते शास्त्रशुद्ध पद्धतीने केले जाईल आणि त्याचा उपयोग चांगल्या कार्यासाठी केला जाईल, याची स्पष्टता येथे होणे अपेक्षित आहे.

अशा संशोधनाने दोन निकषांची पूर्तता केली पाहिजे. एक, संशोधनासाठी उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांचा पाया अतिशय शास्त्रशुद्ध, सुयोग्य व समर्पक हवा. दुसरा निकष म्हणजे, सैद्धांतिक पायावर आधारित व तांत्रिक साधने वापरून या प्रश्नांची उत्तरे देता येणे शक्य व्हायला हवे. अशा संशोधनाने किमान काही तरी चांगले घडून येण्याच्या शक्यता तरी दिसून याव्यात. म्हणजे, या संशोधनांने मूलभूत विज्ञानविषयांत काहीतरी मोलाची भर तरी घालावयास हवी, तंत्रज्ञानविषयक काही नवीन बदल त्याद्वारे घडून येण्याची शक्यता निर्माण झाली पाहिजे किंवा विविध देशांमधील समाजांची सद्यःस्थिती लक्षात घेऊन विकासविषयक धोरण आखण्यासंदर्भात तरी या संशोधनांचा उपयोग व्हायला हवा. बुद्धिमत्ताविषयक संशोधनांना विरोध करणारे आणखी काही मुद्दे उपस्थित करतात. एक तर, मुळात बुद्धिमत्ता मोजायची कशी, यावरच मतमतांतरे

आढळतात. या संदर्भात काही चाचण्या तयार करण्यात आल्या आहेत, त्या अधिकाधिक परिपूर्ण असाव्यात याची काळजी घेण्याचा प्रयत्न झाला आहे. त्या आधारे सर्वसामान्य बुद्धिमत्ता (जनरल इंटेलिजन्स) मोजली जाते. तथापि, सामाजिक बुद्धिमत्ता (सोशल इंटेलिजन्स) आणि भावनिक बुद्धिमत्ता (इमोशनल इंटेलिजन्स) यांचा विचार या चाचण्यांमधून होतो असे नाही. तसेच, अंतःप्रेरणेवर (मोटिव्हेशन) आधारित वा प्रज्ञेवर/प्रतिभेवर (इंट्यूशनवर) आधारित घेतले जाणारे निर्णय या चाचण्यांच्या आणि सर्वसाधारण बुद्धिमत्तेच्या परिघाबाहेर राहिले आहेत, असे दिसते. शिवाय, अशा प्रकारची बुद्धिमत्ता मोजून गटागटांच्या बुद्धिमत्तेची तुलना करायची हे अधिक गोंधळाचे ठरताना दिसते.

बुद्धिमत्तेच्या संदर्भात वंश हा निकष जीवशास्त्रीयदृष्ट्या उपयोगात आणला जाणार आहे की सामाजिकदृष्ट्या हे स्पष्ट होणे गरजेचे ठरते. जनुकीय संशौधन करणा-यांच्या मते वंश या शब्दाकडे जैवभौगोलिकता (biogeographic) या दृष्टीने बघण्याची गरज आहे. एका वंशाच्या विविध उपगटांच्या आर्थिक-सामाजिक स्थितीचा व सभोवतालच्या वातावरणाचा परिणाम त्यांच्या बुद्ध्यांकावर होऊ शकतो. असे काही बारकावे या अभ्यासात लक्षात घेणे गरजेचे ठरते. त्यामुळे एकाच वंशाच्या विविध उपगटांमधील बुद्ध्यांक वेगळा आहे किंवा नाही हे आधी संशोधनांतून सिद्ध व्हायला हवे. जर तो समान असेल तरच एका विशिष्ट वंशाच्या सरासरी बुद्धिमत्तेबाबत नेमका निष्कर्ष काढता येईल. मगच दोन विभिन्न वंशांच्या सरासरी बुध्यांकांचा तौलनिक विचार शक्य होईल. परंतु, अशा प्रकारचे अभ्यास म्हणा वा संशोधन अजूनही हाती घेतले गेलेले नाही. म्हणून बुद्धिमत्तेच्या संदर्भात वंश हा एक निकष/पाया मानणे हेच मुळात बरोबर ठरणार नाही. वंश व बुद्धिमत्ता यांचा विचार करतेवेळी हे संशोधन जीवशास्त्रीयदृष्ट्या करणे गरजेचे आहे की सामाजिक दृष्टिकोणातून ते करण्यात येत आहे, याची स्पष्टता हवी.

बुद्धिमत्तेच्या संदर्भात लिंगभेद करण्याने हा संशोधनविषयक प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनतो. मुली व मुले, स्त्रिया व पुरुष वेगवेगळ्या दृष्टीने विचार व कृती करतात का, यामागे जीवशास्त्रीय कारणे असतात का आणि हे संशोधनातून सिद्ध होऊ शकते का, हे प्रश्न येथे महत्त्वाचे ठरतात. आणखी एक बाब येथे लक्षात घेतली पाहिजे. ती अशी की देशोदेशींच्या बहुतांश समाजांमध्ये अपत्याच्या जन्मानंतर संगोपनापासूनच लिंगभेद केला जातो. त्यामुळे मुलगा व मुलगी यांची जडणघडण लहानपणापासूनच वेगळी होत जाते. सभोवतालच्या या परिस्थितीतून त्यांचे व्यक्तिमत्व



घडत जाते. त्यांच्या मेंदूलाही तशा वर्तनाची सवय लागते. केवळ जीवशास्त्रीयदृष्ट्या असलेल्या भेदांमुळे स्त्री-पुरुषांचे सामाजिक-सांस्कृतिक वर्तन घडते असे नाही तर सभोवतालच्या सामाजिक-सांस्कृतिक वातावरणामुळेही त्यांच्या वर्तनाला वळण लागते. त्यामुळे एकाच देशातील विविध गटांमधील स्त्री-पुरुष आणि देशोदेशींमधील विविध समाजगटांमधील स्त्री-पुरुष यांच्या वर्तनाचा अभ्यास कसा करणार, याची स्पष्टता होणे गरजेचे ठरते. एकंदरीत असे दिसते की, वंश आणि लिंगभेद यांच्या संदर्भात बुद्धिमत्ताविषयक संशोधनाचा पाया असायला हवा तेवढा बळकट नाही.

दुसरा मुद्दा आहे तो या संदर्भातील प्रश्नांची सुयोग्य उत्तरे सैद्धांतिक व तांत्रिक साधनांच्या मदतीने मिळण्याचा. या संदर्भात माणसाची जनुकीय रचना महत्त्वाची भूमिका बजावते. बुद्धिमत्ता ही जनुकांद्वारे मिळते असे म्हटले जाते. पण जनुकांबाबत हे लक्षात घेतले पाहिजे की जन्मदात्या आई-वडिलांकडून मिळालेल्या जनुकांवर सभोवतालच्या वातावरणाचा परिणाम होत असतो. त्यामुळे कधीकधी त्यांच्या कार्यात बदल संभवतो. 'नेचर' आणि 'नर्चर' हा मुद्दा येथे उपस्थित होतो. म्हणजे, बुद्धिमत्ता मोजताना जनुके हे जर एक तांत्रिक साधन असेल तर त्या साधनात परिस्थितीनुसार बदल घडून येऊ शकते हे समजून घेणे गरजेचे आहे. शिवाय, अशा प्रकारचे संशोधन धोरणात्मक बाबींवर कसा प्रभाव पाडू शकेल हा तिसरा मुद्दाही येथे विचारता घेतला पाहिजे. वंश वा लिंगभेदावर आधारित एखाद्या गटाची बुद्धिमत्ता कमी असेल तर ती वाढण्याच्या उद्देशाने धोरणकर्त्यांनी धोरणे आखणे हे उचित ठरू शकेल. पण व्यवहारात असे घडतेच असे नाही. समाजातील या संदर्भातील उतरंड कायम राहावी या उद्देशाने या संशोधनांचा उपयोग करून घेतला जाण्याचीच शक्यता असते.

**वैज्ञानिक सत्य पुढे यावे**

बुद्धिमत्तेचा विचार करता गटागटांत भेद असतात, हा विषय आजचा नाही त्याला किमान शंभर वर्षांचा पूर्वेतिहास आहे. दोन शतकांपूर्वी सुमारे १८००च्या काळात, eugenicsचे 'फादर' म्हणून ओळखले जाणारे फ्रान्सिस गाल्टन यांच्या विचारांना समाजाने मान्यता दिली होती. गुन्हेगारी ही आनुवंशिक आहे असे मत मांडणारे संशोधक Cesare Lombroso यांचेही मत समाजाने मान्य केले होते. नोबेल पुरस्कारप्राप्त संशोधक William Shockley हे वंश व बुद्धिमत्ता याविषयीच्या संशोधनामुळे वादाच्या भोव-यात अडकले होते. अलीकडच्या काळातील Arthur Jensen, Michael Levin, John Philippe हे संशोधकदेखील याच विषयावरील

चर्चेमुळे वादग्रस्त ठरले होते. याशिवाय इतरही अनेक संशोधक असे संशोधन नाकारीत नाहीत, तर काही जण हे संशोधन योग्य वाटत असूनही या वादात येण्याचे टाळतात.

जगप्रसिद्ध हार्वर्ड विद्यापीठाचे तत्कालीन अध्यक्ष लॉरेन्स समर्स यांनीदेखील नैसर्गिक क्षमता कमी असल्यामुळे विज्ञान-संशोधनांत स्त्रिया कमी पडतात, असे मत मांडल्याने वादळ निर्माण झाले होते. वंश व बुद्धिमत्ता या संदर्भात संशोधन करून हे वैज्ञानिक सत्य लोकांपुढे आले पाहिजे, असे मत मांडणा-या गटातील स्टीफन सेसि आणि वेंडी विल्यम्स या दोन संशोधकांनी याबाबत काही मुद्दे उपस्थित केले आहेत. वंश व बुद्धिमत्ता यांबाबत जरा सौम्य मत ते मांडतात. म्हणजे, बुद्धिमत्ता ही शंभर टक्के आनुवंशिकच असते असे नाही, तर सभोवतालच्या परिस्थितीही त्यावर परिणाम करीत असते, असा सर्वमान्यतेकडे जाणारा दृष्टिकोण ते स्वीकारतात. जेम्स वॅटसन यांनी तर 'सर्वांची बुद्धिमत्ता (गौरवर्णीय अमेरिकी नागरिक व आफ्रिकी वंशाचे नागरिक) सारखीच असते या गृहीतकावरच आपली सर्वधोरणे बेतलेली असतात पण प्रत्यक्षात विविध चाचण्यांमधून असे असतेच असे नाही,' असे स्पष्ट विधान केल्याने मोठाच रोष ओढवून घेतला होता. त्यानंतर त्यांनी 'आफ्रिकी वंशांचे नागरिक कमी दर्जाचे आहेत,' असे आपल्याला म्हणायचे नाही, असे म्हणून सारवासारव करण्याचा प्रयत्न केला तरी त्यांचे विधान वादग्रस्त ठरले होतेच.

काहींच्या मते वॅटसन यांच्या विधानाचा वैज्ञानिक दृष्टिकोणातून विचार केला पाहिजे. तेव्हा केलेल्या काही चाचण्यांमधून आफ्रिकी वंशांच्या नागरिकांचा बुद्ध्यांक कमी आढळला, पण वॅटसन यांनी बुद्धिमत्ता हा शब्द वापरल्याने गोंधळ निर्माण झाला. बुद्धिमत्ता (इंटेलिजन्स) याचा अर्थ 'मूलभूत/जन्मजात आकलन क्षमता' असा घेतला गेला आणि या वेळी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा, अनारोग्य इत्यादी बाबींचा बुद्ध्यांकावर परिणाम होतो हे विचारात घेतले गेले नाही. तसेच अशा प्रकारचा अभ्यास करून सुधारणांच्या दिशेने पाऊल टाकता आले असते पण तसे न घडता वंशभेद या दृष्टिकोणातून या विधानावर वादळ उठले. असे अभ्यास करताना सभोवतालच्या वातावरणाचा आणि शिक्षणाच्या व इतर (व्यक्तिमत्व घडण्याच्या दृष्टीने मिळणा-या) सोयी-सुविधांचा परिणाम बुद्ध्यांकावर होऊ शकतो/होत असतो, याचा विचार केला जायला हवा, असे मत काही संशोधक ठामपणे मांडतात. पण अनेक संशोधक याचा विचार करणे गरजेचे मानत नाहीत. संशोधकांमध्ये दोन गट असल्याने दरवेळी दोन्ही गटांच्या सर्व मुद्यांवर सर्वंकष चर्चा होते असेही नाही. मग,



काही महत्त्वाचे मुद्दे दुर्लक्षित राहू शकतात/राहतात. त्यामुळे मूळ विषयाशी संबंधित महत्त्वाच्या मुद्यांचा ऊहापोह होऊन सुधारणांच्या दिशेने जाणे शक्य होते असे नाही.

संशोधकांच्या मते विज्ञान-संशोधन होणे गरजेचे ठरते. कारण, त्यामुळे गैरसमज दूर होतात व सत्य समजण्यास मदत होते. उदाहरणार्थ, बुद्धिमत्ता व लिंगभेद या विषयावर चर्चा झाली. त्यामुळे त्या संबंधीच्या वेगवेगळ्या बाजू अभ्यासल्या गेल्या. या अभ्यासांमधून असे दिसून आले की स्त्रिया गणितात मागे नाहीत. उलट, अमेरिकेत तर गणिताच्या अध्ययनात स्त्रियांची संख्या वाढताना दिसते आहे. या विषयात त्या प्राविण्यही मिळवित आहेत. इतर काही देशांतही असे चित्र आढळते. जनुकीय संशोधन व मेंदू संशोधन हे आता महत्त्वाच्या टप्प्यावर पोहचत आहे. दोन गटांमधील भेदांचा विचार करता जनुकीय संशोधनांतून सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतात असे नाही. कारण, जनुकांवरही सभोवतालच्या वातावरणाचा परिणाम होऊ शकतो व त्याचे वर्तन काही प्रमाणात बदलू शकते असे मानणारा एक गट आहे. याशिवाय, मेंदू संशोधनातूनही काही बाबी पुढे येत आहेत, त्यामुळे मानवी आरोग्य अधिकाधिक चांगले असावे या दृष्टीने काही उपाययोजना करणे शक्य होऊ लागले आहे. म्हणून अशा नवीन संशोधनांना चाप लावणे हे योग्य ठरणार नाही. मात्र, सत्य माहिती संशोधकाकडून योग्य शब्दांमध्ये मांडली जाणे आवश्यक ठरते. संशोधनांतून पुढे आलेली माहिती मांडण्याचे स्वातंत्र्य संशोधकांना असले पाहिजे. इतरांनी या महितीचा दुरुपयोग करू नये आणि या विषयांना राजकीय रंग येऊ नये याची खबरदारी घेतली जाऊ शकते.

विज्ञान-संशोधन हे असे क्षेत्र आहे की जेथे सतत नवनवीन काही ना काही बाबी पुढे येऊ शकतात/येतात. पण संशोधनांतून पुढे येणारी माहिती संशोधकांच्या इतर सहका-यांनी, संपादकांनी अथवा संशोधनांसाठी निधी उपलब्ध करून देणा-यांनी दडवून ठेवणे वा संबंधित संशोधकांवर दबाव आणणे हे योग्य ठरेल का ? असे घडले तर विज्ञान हे विज्ञान राहील का की विज्ञानाला धर्माच्या (रिलिजन) गटात मोडावे लागेल ? अशी कुंठितावस्था निर्माण झाली तर समाजगट प्रगतीपथावर जाऊ शकतील का ? या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे शोधणे गरजेचे ठरते.

चालू शतक हे विज्ञान-संशोधनाचे, तंत्रज्ञानविषयक बदलांचे शतक आहे असे म्हणत असतानाच बुद्धिमत्ता व बुद्ध्यांक या विषयाशी संबंधित वाद-चर्चा अशा प्रकारे पुढे येत आहे. संबंधितांकडून यावर योग्य उत्तर शोधले जाईल अशी अपेक्षा करता येईल. ■■

**शिक्षण**

# पालकांकडे पालकत्व शाळांचे

ज्ञान व विज्ञानयुगाच्या या जगात सतत काहीतरी नवनवीन घडते आहे, कुठे नवीन उत्पादने बाजारपेठेत दाखल होत आहेत, कुठे नवीन तंत्रज्ञान येते आहे तर कुठे आहे त्या तंत्रज्ञानात सुधारणा होत आहेत. ज्ञान आणि विज्ञानयुगाची कास धरण्याची इच्छा असणा-यांना रोजगारासाठी का होईना पण या नवीन उत्पादनाशी, तंत्रज्ञानाशी संबंधित नवनवीन बाबी शिकूनही घ्याव्या लागत आहेत. 'प्रसंगी अखंडित वाचीत जावे' याप्रमाणे 'प्रसंगी अखंडित शिकत जावे' हा या जगाचा मंत्र ठरावा, असा सध्याचा काळ आहे, असे म्हणणे ही अतिशयोक्ती ठरणार नाही. एकीकडे जागतिक पातळीवर 'सतत शिकण्याची ही प्रक्रिया अनिवार्य ठरत असतानाच दुसरीकडे औपचारिक शिक्षणाचा मार्ग असणा-या 'शाळा आणि त्यांद्वारे मिळणारे शिक्षण' हा विषयही महत्त्वाचा ठरू लागला आहे. अलीकडे ब्रिटनमध्ये हा विषय चर्चेचा बनला आहे.

शिकण्याचे महत्त्व अधोरेखित झालेल्या समाजगटांमध्ये 'चांगल्या शाळा' हा आता चर्चेचा मुद्दा बनला आहे. शिक्षणाबाबत पालक जागरूक झाले असल्याने आपल्या पाल्यांना 'चांगल्या शाळा' मिळाव्यात यासाठी आता अनेक पालक धडपडताना दिसतात. पालकांचा शिक्षणासंदर्भातील हा उत्साह पाहून शिक्षणप्रक्रियेतील पालकांचा सहभाग वाढावा, यासाठी गेल्या दशकात, ब्रिटनमध्ये तत्कालीन पंतप्रधान टोनी ब्लेअर यांनी पुढाकार घेतला होता. २००६मध्ये 'एज्युकेशन ॲक्ट'द्वारे त्यांनी पालकांकडे शाळांचे पालकत्व देऊन त्यांना शाळा चालू करण्याची परवानगी दिली होती. तसेच या कामी पालकांना मदत करण्याची जबाबदारी 'शाळा आयुक्तां'वर (स्कूल कमिशनर) सोपविण्यात आली होती. याशिवाय, ब्लेअर यांच्या या निर्णयामागे एक राजकीय कारणही होते. ते म्हणजे स्थानिक शिक्षण मंडळांच्या वर्चस्वाला त्यांना सुरुंग लावायचा होता. अर्थात, या 'ॲक्ट'मुळे पालकांनी धडाधड शाळा सुरू केल्या असे घडले नाही. पण यामुळे काही पालकांना शाळा चालू करण्याची प्रेरणा मिळाली. मात्र शाळा चालू करण्याची प्रक्रिया पालकांसाठी एवढी सोपीही ठरली नाही. त्यामुळे कंटाळून काही पालकांनी शाळा चालू करण्याचा नाद सोडला, तर काहींनी आपल्या पाल्यांसाठी आहे त्या शाळांमध्ये प्रवेश घेऊन शिक्षणासंदर्भात तडजोड केली.



अलीकडे, आणखी एक नेते -डेव्हिड कॅमेरॉन यांनी - शिक्षणविषयात विशेष लक्ष घालण्याचे ठरविले आहे. त्यांच्या नव्या कार्यक्रमपत्रिकेनुसार येत्या दशकात सुमारे तीन हजार नवीन शाळा चालू करण्याची त्यांची योजना असून त्यांचे व्यवस्थापन धर्मार्थ कार्य करणा-या संस्थांच्या मदतीने वा पालकांच्या मदतीने करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. यांद्वारे शिक्षणाचा दर्जा वाढावा अशी अपेक्षा आहे. आपल्या पाल्याच्या शिक्षणासंदर्भात पालकांच्या हाती अधिकार देऊन शिक्षणप्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढविण्याची ही कल्पना ब्रिटनने स्वीडनकडून घेतली आहे. पण यातून अनेक नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत. हे 'स्वीडीश मॉडेल' ब्रिटनमध्ये रुजेल का ? केवळ पालकांनी शाळा चालविल्या तर शिक्षणाचा दर्जा सुधारेल का ? शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी असणा-या इतर मार्गांचा अवलंब करायचा की नाही ? शाळा चालू करण्यासाठी किती पालक पुढे येतील ? समजा काही पालकांनी यासाठी उत्साह दर्शविला तरी त्या शाळा कायमस्वरूपी नीट चालू राहतील का ? अशा काही प्रश्नांची चर्चा ब्रिटनमध्ये होते आहे.

या संदर्भात पालकांचे म्हणणे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्या वेळी असे आढळले की, या योजना समजावून घेण्यात ब-याच पालकांना रस होता. पण योजनांचा बारकाईने विचार करताना त्यांनी अनेक शंका उपस्थित केल्या. काहींनी टीकेचा सूरही पकडला. पालकांनीच शाळा चालविण्याची कल्पना एकूणातील (सर्वेक्षण केलेल्या पालकांपैकी) ४६ टक्के पालकांनी उचलून धरली. ३१ टक्के पालकांनी याच्या विरोधात मत दर्शविले. तर २३ टक्के पालकांनी निश्चित मत मांडले नाही. संधी मिळाल्यास शाळा चालविण्यात आपला शंभर टक्के सहभाग असेल असे एकुणातील फक्त ७ टक्के पालकांनी स्पष्ट केले. ४३ टक्के पालकांनी आपला कदाचित सहभाग असेल असे मोघम उत्तर दिले तर १२ टक्के पालकांनी ही शक्यता पूर्णपणे नाकारली. स्थानिक शिक्षण मंडळांकडूनच शाळा चालविण्यात याव्यात असे मत ४० टक्के पालकांनी मांडले. तर स्थानिक शिक्षण मंडळांपेक्षा खाजगी कंपन्यांकडून वा धर्मदाय संस्थांकडून शाळा चालविल्या जाव्यात असे मत ५ टक्के पालकांनी व्यक्त केले. नफ्याच्या उद्दिष्टाने काही कंपन्यांकडून चालविल्या जाणा-या शाळांना ३ टक्के पालकांनी समर्थन दिले. धार्मिक गटांकडून चालविल्या जाणा-या शाळांच्या बाजूने फक्त एक टक्का पालकांनी होकारार्थी उत्तर दिले. तर, शिक्षकांनीच शाळा चालवाव्यात असे मत ३२ टक्के पालकांनी व्यक्त केले.

'चांगल्या शाळा' म्हणजे काय याबद्दलही पालकांनी मते मांडली. संगणक शिक्षणाच्या सोयी-सुविधा उपलब्ध असणे (८१ टक्के ) आणि पाल्यांच्या विकासाबाबत शिक्षकांनी सतत पालकांच्या संपर्कात असणे (७८टक्के) या दोन बाबींना पालकांनी प्राधान्य दिले. शैक्षणिक निकाल (६३ टक्के) आणि शाळापूरक वा अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर बाबी-खेळ इत्यादी (४७टक्के) असा पालकांचा कल आढळला. शाळांच्या व पाल्यांच्या प्रगतीबद्दल पालकांना सतत माहिती मिळणे हेही पालकांच्या दृष्टीने (८२ टक्के) महत्त्वाचे आहे. शिक्षकांशी कधीही संपर्क साधता यावा असेही ८३ टक्के पालकांना वाटते. शाळांच्या विविध योजनांसंदर्भात आपल्याला मत देता यावे असेही (८२ टक्के) पालकांना वाटते.

खरे तर पालकांनी शाळा चालविण्याची योजना अलीकडे आखण्यात येऊ लागली तरी बालशिक्षणाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणा-यांनी बालकाचा विकास व पालकांचा आणि शाळांचा सहभाग यांबाबत मते मांडली आहेत. डॉ. मारिया मॉन्टेसोरी यांनी तर शाळा या घरांसारख्या असल्या पाहिजेत आणि शिक्षकांनी पालकांची भूमिका बजावावी, असे म्हणून ठेवले आहे.

ब्रिटनने ही योजना स्वीडनकडून घेतली असल्याने तेथे या योजनेचे काय झाले ते पाहू या. स्वीडनने १९९२मध्ये औद्योगिक कंपन्या, धर्मदाय संस्था आणि पालकांना नवीन शाळा चालू करण्याची परवानगी दिली. कोणत्याही शाळेत प्रवेश घेण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेकडून काही ठराविक रकमेची 'व्हाउचर्स' पालकांना देण्यात आली. या 'फ्री स्कूल्स'मध्ये प्रवेश घेणा-यांची संख्या १९९२मधील एक टक्क्यांवरून वाढत वाढत ती अलीकडच्या काळात १५ टक्क्यांवर पोहचली आहे. या नवीन शाळांमधील काही शाळा पालकांनी चालू केलेल्या होत्या. आज सुमारे दहा टक्के शाळा पालकांनी चालू केलेल्या आहेत, असे तेथील चित्र आहे. या बहुतेक शाळा सुशिक्षित पालकांनी चालू केलेल्या होत्या, कारण प्रचलित शालेय शिक्षणाबाबत ते समाधानी नव्हते. पण, आपल्या पाल्याचे शिक्षण झाल्यानंतर काही पालक-शिक्षकांचा शाळांबाबतचा उत्साह टिकला नाही. मग अनेक खाजगी संस्था, कंपन्या यांनी त्या शाळा चालवायला घेतल्या. या शाळांमधील व्यवस्थापनातील पालकांचा सहभाग कमी झाला असला तरी शिक्षणात मात्र पालकांचा सहभाग राहील असा प्रयत्न नव्या व्यवस्थापनाने केला. शाळांमधील घडामोडींबाबत पालकांना माहिती देत राहणे, काही योजनांमध्ये त्यांचा सहभाग घेणे हे उपक्रम पालकांच्या पसंतीस उतरले असे आढळले.



स्वीडन हा एक समृद्ध देश असल्याने तेथील चित्र वेगळे असू शकते, असे मत ब्रिटनमध्ये काही जण मांडतात. तरीदेखील स्वीडनमध्येही पालकांच्या शाळांनी संख्यात्मकदृष्ट्या फार मोठा टप्पा गाठल्याचे दिसत नाही.

अमेरिकेतही अलीकडे 'होम स्कूलिंग'ने जोर धरल्याचे दिसते. १९९९ मध्ये अमेरिकेत 'होम स्कूलिंग'द्वारे शिक्षण घेणा-या मुलांची संख्या ८ लाख ५० हजार होती, ती २००३ मध्ये ११ लाख इतकी म्हणजे सुमारे ३० टक्के इतकी वाढली. अमेरिकेत काही वर्षापूर्वी 'मानवाची उत्क्रांती' हा विषय शिकविण्यावरून वाद निर्माण झाला होता. हे जग (ईश्वराच्या) 'इंटेलिजन्ट डिझाइन'मुळे निर्माण झाले आहे, असे मुलांना शिकविण्यात यावे असे मत काहींनी मांडले होते. आपल्या पाल्यांनी 'इंटेलिजन्ट डिझाइन' समजून घ्यावे असे ज्या पालकांना वाटत होते त्यांनी 'होम स्कूलिंग'ला प्राधान्य दिले होते, अशी याची कारणमीमांसा काहींनी केली आहे. तर, आपण आपल्या मुलांना अधिक चांगले शिकवू शकतो, असे काही पालकांना वाटल्याने त्यांनी मुलांना घरी शिकविण्याचे ठरविले असावे, असेही काहींनी म्हटले आहे. अर्थात, 'सेक्युलर ब्रिटन'मध्ये अमेरिकेप्रमाणे घडणार नाही, असाही काहींचा आशावाद आहे. तथापि, शिक्षणविषयक घडामोडींमध्ये पालकांचा वाढता रस, आपल्या पाल्यांनी काय शिकावे याबाबत पालकांची असणारी मते, शिक्षणविषयक नवीन संशोधन, विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र व त्याबाबतचे संशोधन, एकंदरीत बदलती सामाजिक परिस्थिती इत्यादी अनेक बाबींमुळे पालकांचा शिक्षणांतील सहभाग वाढेल, असा अंदाज अलीकडे व्यक्त करण्यात येतो.

कोणत्याही देशातील कोणत्याही सरकारने पालकांनी शाळा चालविण्यासाठी योजना आखल्या तरी शिक्षणाचा दर्जा वाढविण्याचा व पालकांना पाल्याच्या शिक्षणासंदर्भात स्वातंत्र्य देण्याचा हा अल्पसाच प्रयत्न राहील, असेही काही म्हणतात. त्यामुळे या पाऊलवाटेचा महामार्ग होईल, असे चित्र सध्या तरी उभे राहात नाही. एक मात्र खरे की पाल्यांच्या शिक्षणविषयक व व्यक्तिमत्वविषयक विकासात पालकांची भूमिका मोठी व महत्त्वाची आहे हे आता अधोरेखित झाले आहे. घरी 'जागरूक पालक' व शाळेत 'उत्कृष्ट शिक्षक' हे आज गरजेचे आहे. शाळाव्यवस्थापनात पालकांचा सहभाग असो वा नसो, पण शिक्षणात पालकांचा वाढता सहभाग हा चांगला ठरू शकेल, असे मत यानिमित्ताने मांडले जात आहे. शाळा, शिक्षक, विद्यार्थी व पालक या सर्वांची वीण आज घट्ट व्हायला हवी, असे चित्र पुढे येते आहे. ■■

तंत्रज्ञान

# महाजालात युवक

इंटरनेटच्या महाजालाने आज संपूर्ण जग जोडले गेले आहे. माहितीच्या महाजालाच्या या अद्भूत खजिन्यातून विविध प्रकारच्या माहितीचा उपयोग करणा-यांची, तसेच या माहितीत भर घालणा-यांची संख्या दिवसेंदिवस वाढतेच आहे. याशिवाय या महाजालाचा उपयोग विविध उत्पादनांची खरेदी करण्यासाठी, प्रवासासाठी जागेचे आरक्षण करण्यासाठी, बँकेचे व्यवहार करण्यासाठी इत्यादी अनेक कामांसाठी होऊ लागला आहे. अलीकडे भारतातही इंटरनेटचा वापर करणा-यांची संख्या वाढू लागली आहे. विविध देशांत इंटरनेटच्या वापराबाबतचे अभ्यास आता होऊ लागले आहेत. देशोदेशींमधील तरुण पिढी या महाजालाचा अधिक उपयोग करून घेताना दिसते. आशियातील चीन व जपान या दोन देशांमधील तरुण पिढी इंटरनेटचा उपयोग कसकसा करते व त्याचा त्यांच्या जीवनावर काय परिणाम होतो याची माहिती अलीकडे पुढे आली आहे.

चीन हा मोठ्या लोकसंख्येचा देश. या देशात तरुणांची संख्याही भरपूर. इंटरनेटच्या वापराबाबत अमेरिकेला मागे टाकणा-या चीनमध्ये, इंटरनेट वापरणा-यांची संख्या २००८मध्ये सुमारे २५ कोटी ३० लाख एवढी होती. यांपैकी सुमारे ६८ टक्के नागरिक हे तीस वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत. म्हणजे १९८०नंतर जन्मलेली पिढी इंटरनेटच्या वापरात आघाडीवर आहे. चीनमध्ये या पिढीला balinghou असे संबोधले जाते. महाविद्यालयांत शिकणारी आणि नोक-यांच्या क्षेत्रांत नुकतेच पाऊल ठेवलेली ही पिढी २००८ मध्ये सिचुआन प्रांतात झालेल्या भूकंपाच्या वेळी मदतकार्यात आघाडीवर होती. तसेच काही वर्षांपूर्वी चीन-जपान यांच्यातील राजकीय वादाच्या वेळी जपान-विरुद्ध निदर्शने करण्यातही या पिढीचा सहभाग होता. म्हणजे, त्यांच्या सामाजिक जाणीवाही जागृत आहेत, असे दिसते. ही पिढी इंटरनेटचा वापर कसा करीत असेल हे समजून घेणे उद्बोधक आहे.

चित्रपट, संगीत आणि जगभरातील दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमांची माहिती मिळविण्यासाठी म्हणजे मनोरंजनासाठी इंटरनेटचा वापर करण्याला हा गट प्राधान्य देतो. या balinghouमधील एक गट subtitle squads या नावाने ओळखला जातो.



जपानमधील नाटके व इतर कार्यक्रम यांमधील संवादांचे चिनी भाषेत भाषांतर करून असे भाषांतरित कार्यक्रम शक्यतो त्यांच्या नियोजित प्रसाराच्या दिवशीच इंटरनेटवर upload करण्याचे काम हा गट करतो. म्हणजे दूरदर्शनवरील कार्यक्रम इंटरनेटवर लगेचच पाहणे शक्य होते. जपानमधील 'ॲनिमेटेड' कार्यक्रम, कॉमिक्स वा फॅशनसंबंधीची नियतकालिके यांसाठीही ही सेवा उपलब्ध होते. या प्रकारामुळे जपनाचा एक फायदा असा होतो की जपानी संस्कृतीचा प्रसार चीनमध्ये होऊ लागला आहे. तर याचा तोटा असा की, जपानमध्ये अशा कार्यक्रमांचे 'कॉपीराइट' ज्यांच्याकडे आहेत त्यांच्यासमोर 'कॉपीराइट' कसे जपायचे हे आव्हान उभे ठाकते. या शिवाय चिनी भाषेवर जपानी भाषेचाही काहीसा प्रभाव पडून चिनी भाषेतील काही शब्द थोडा जपानी अवतार धारण करून पुढे येत आहेत. जगभरातील व्हिडिओ 'शेअर' करणा-या You Tubeचे चिनी भावंड म्हणता येईल असे Tudou.com हे आहे. त्यामुळे अनेक balinghouचा संगणक हा एकप्रकारे त्यांची TVची गरज भागवतो, असे दिसते. हेच balinghou खरेदी करतानाही वेबसाईटचा आधार घेतात. तसेच अनेक तरुणांनीही आपल्या उत्पादनांची, सेवांची जाहिरात वेबसाईटवर केली आहे.

युवकांमधील सामाजिकता वाढण्यासाठीही इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. ई-मेल, ब्लॉग आणि इन्सटंट मेसेजिंग इत्यादींमुळे तरुणांमधील नेटवर्किंग वेगाने होताना दिसते. त्यामुळे 'इंटरनेटच्या माध्यमातून सर्व काही शक्य' या निष्कर्षाप्रत चीनमधील balinghou आले आहेत. महाविद्यालयांतून वा कार्यालयांमधून घरी आल्यावर समाजात न मिसळता संगणकापाशी खिळून बसणे याला जपानी भाषेत hikikomori असे म्हणतात. चिनी युवकही या गटात मोडू लागले आहेत. म्हणजे इंटरनेटच्या माध्यमातून त्यांचे सामाजिकीकरण होत असते पण त्याला प्राधान्य दिल्याने घरानजीकच्या त्यांचे सामाजिकीकरण कमी होते का हा प्रश्न उपस्थित होतो. चीनसंदर्भात लक्षात घेण्यासारखी बाब अशी की एका कुटुंबात एकच मूल असल्याने या एकुलत्या एका मुलाला आई-वडिलांनी चांगले शिक्षण दिले. परिणामी, विविध विद्यापीठांमधून पदवीचे भेंडोळे तर मुलांनी मिळविले, पण स्पर्धा वाढली, सर्वांना चांगल्या नोक-या मिळाल्या नाहीत याचे सामाजिक दडपणही त्यांना आले. त्यामुळे हाती नोकरी नसताना समाजांत वावरणे या नवतरुणांना फारसे रुचले नाही. त्यामुळेही त्यांनी संगणकाच्या पडद्याशी मैत्री केली. Balinghou गटाला NEET असेही एक नाव आहे. **N**ot in **E**ducation, **E**mpolyment or **T**raining असा त्याचा अर्थ आहे.

संगणकाशी मैत्री करून समाजजीवनापासून काही प्रमाणात दूर पळण्याचे असेच काहीसे चित्र जपानमध्येही आढळते. जपानमधील मंत्रालयाच्या माहितीनुसार २० ते २९ या वयोगटांतील परदेशी जाणा-या जपानी तरुणांची संख्या १९९६मध्ये ४६ लाख ३० हजार इतकी होती. २००६ मध्ये ही संख्या २९ लाख ८० हजारपर्यंत घसरली. आर्थिकदृष्ट्या परदेशी जाणे त्यांना परवडणारे नाही, ही बाब येथे नव्हती. अभ्यासकांनी याचा अर्थ असा काढला आहे की, पूर्वी म्हणजे १९९०च्या दशकात जपानमधील तरुण परदेशांत जाण्यासाठी उत्सुक असायचे. पर्यटनाचा अनुभव त्यांना गरजेचा वाटत होता. पण अलीकडे, मात्र तरुणांना तसे वाटत नाही. संगणकावर आपण एखाद्या विशिष्ट पर्यटनस्थळाची सर्व माहिती वाचली आहे, कुणाच्या ब्लॉगवर तसे वर्णन वाचले अहे, फोटो बघितले आहेत, शिवाय, दूरचित्रवाणीवर आपण सर्व काही बघितले आहे, आपल्याला जग माहिती आहे, असा त्यांचा समज होऊन पर्यटनाप्रती त्यांना आकर्षण वाटत नसावे, असे मत अभ्यासकांनी मांडले आहे.

महाविद्यालयीन शिक्षण घेणारे वा अर्धवेळ/पूर्णवेळ नोकरी करणारे तरुणही समाजजीवनांत कमी प्रमाणात मिसळतात. कारण त्यांना संगणकावर काहीतरी 'अपलोड' वा 'डाऊनलोड' करायचे असते किंवा मोबाइलवर 'मेसेज' करायचा असतो. थोडक्यात, ते जगाशी 'कनेक्टेड' असतात; पण तेवढ्या प्रमाणात घरात वा समाजात ते 'कनेक्टेड' असतातच असे नाही. तरी काही युवक या 'कनेक्टेड' असण्याचा चांगला उपयोग करीत असतात. चीन व जपानचे आर्थिक संबंध परस्परांमध्ये गुंतले गेले आहेत. त्यामुळे मोठ्या संख्येने चिनी युवक जपानमध्ये शिक्षण घेतात व जपानी युवक चीनमध्ये शिक्षण घेतात. कधी ते लहान-मोठ्या दुकानांत अर्धवेळ नोकरीही करतात. चिनी विद्यार्थी गरजेनुसार जपानी भाषा व जपानी विद्यार्थी चिनी भाषा शिकून घेतात व दोन्ही भाषांमधील आपल्या 'नेटवर्किंग'द्वारे आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्नशील राहतात.

संगणक व मोबाइल फोन यांद्वारे इंटरनेट वापरण्याबाबत मात्र चीन व जपानमध्ये भिन्न दृष्टिकोण आहे. मोबाइलफोनद्वारे इंटरनेट वापरण्याला जपानमध्ये प्राधान्य दिले जाते. तर संगणकामार्फत इंटरनेट वापरण्याला चीनमध्ये प्राधान्य दिले जाते. दुसरी बाब म्हणजे जपानने 'कॉपीराइट'ला महत्त्व दिल्याने 'संगणकामार्फत काहीही करता येते,' हा विचार जपानमध्ये बळावला नाही. तर चीनमध्ये नेमकी याच्या उलट परिस्थिती आहे. शिवाय, लॅपटॉपच्या वापराच्या तुलनेत मोबाइल फोनचा वापर सुलभ असून तो सतत 'कनेक्टेड' असतो. त्यामुळे जपानी युवक मोबाइल फोन अधिक वापरतात.



जपानमधील नागरिक वयोगटानुसार मोबाइल फोनचा वापर कसकशा प्रकारे करतात ते तेथील एका संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून पुढे आलेल्या महितीवरून (खालील तक्ता पाहावा) स्पष्ट व्हावे. *(टक्केवारी)*

| अनु. | मोबाइल फोनचा वापर | वयोगट १० ते १९ | वयोगट २० ते ५९ |
|---|---|---|---|
| १ | संगीत डाउनलोड करण्यासाठी (सशुल्क) | १८.२ | २४.१ |
| २ | संगीत डाउनलोड करण्यासाठी (विनाशुल्क) | ५७.१ | ३५.८ |
| ३ | स-दृष्य (व्हिज्युअल) माहिती डाउनलोड करण्यासाठी | ३४.२ | २४.९ |
| ४ | ॲनिमेटेड चित्रांसह ई-मेल पाठविण्यासाठी | २६.८ | ३२.१ |
| ५ | रिंगटोन व रिंगव्हॉइससाठी | २६.३ | २६.८ |
| ६ | गेम्स खेळण्यासाठी | १८.२ | २४.१ |
| ७ | यू ट्यूबसारख्या वेबसाईटला भेट देण्यासाठी | १८.० | ६.७ |
| ८ | बुलेटिन बोर्ड सर्व्हिससाठी | २१.२ | १२.५ |
| ९ | सोशल नेटवर्किंग साइटला भेट देण्यासाठी | २४.८ | २०.२ |
| १० | खाजगी/वैयक्तिक वेबसाइटसाठी | १४.३ | २.७ |
| ११ | ब्लॉग लिहिण्यासाठी | ११.५ | ४.० |
| १२ | मित्रांच्या वेबसाइटला भेट देण्यासाठी | २७.८ | ४.६ |
| १३ | मित्रांच्या ब्लॉगला भेट देण्यासाठी | १७.९ | ६.८ |
| १४ | मान्यवरांच्या ब्लॉगला भेट देण्यासाठी | १४.४ | ९.८ |
| १५ | व्यक्तिगत माहिती देण्यासाठी | १४.७ | १.७ |
| १६ | खरेदी करण्यासाठी | ९.६ | १५.४ |
| १७ | लिलावात सहभागी होण्यासाठी | ८.९ | १३.८ |
| १८ | शाळासंबंधीची माहिती देणा-या अनधिकृत वेबसाइटसाठी | १.६ | ०.२ |

संदर्भ - Data from a survey carried out during 22-28 April 2008, NTT DOCOMO's Mobile Society Research Institute

या तक्त्यावरून असे दिसून येते की, मोबाइल फोनचा वापर प्रामुख्याने मनोरंजनासाठी व माहिती मिळविण्यासाठी होतो आहे तसेच त्याद्वारे 'सोशल नेटवर्किंग'ही घडते आहे. या 'नेटवर्क सोसायटी'चा उपयोग समाजासाठी नेमकेपणाने व्हावा यासाठी काय करावे, याचा विचार आता केला पाहिजे आणि देशोदेशींच्या समाजांमध्ये हाच प्रश्न येथून पुढे महत्त्वाचा ठरेल, असे मत अभ्यासक मांडतात. ■■

आर्थिक

# विकास एकाचा, विस्थापन दुस-याचे

गरिबीचे उच्चाटन घडून येण्यासाठी वेगवान आणि खोलवर झिरपणा-या आर्थिक विकासाचा आग्रह धरला जातो. परंतु, अलीकडील दोन-तीन दशकांमध्ये मात्र उभ्या जगभरातच एक मोठा विचित्र विरोधाभास तितक्याच वेगाने आणि ठळकपणे सामोरा येतो आहे. गरिबीच्या निराकरणासाठी ज्या आर्थिक विकासाची कास धरावयाची ती आर्थिक विकासाची प्रक्रियाच दारिद्र्याला जन्म देत असेल तर या तिढ्यातून सुटायचे तरी कसे, हा प्रश्न नियोजनकर्त्यांना आताशा अधिकाधिक प्रमाणात छळू लागलेला दिसतो. हा एक मोठा जटिल आणि खरोखरच विचित्र तिढा आहे. सर्वसामान्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी जे विकास प्रकल्प हाती घेतले जातात त्या प्रकल्पांमुळे विस्थापित होणा-या लोकसमूहांचा प्रश्न या सगळ्या तिढ्याच्या केंद्रस्थानी आहे. एखादा विकास प्रकल्प पूर्ण होऊन वर्षे लोटली तरी प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न लोंबकळत असतो, असाच सर्वसाधारण अनुभव असल्यामुळे विकास प्रकल्पांनाच विरोध होऊ लागल्याचे चित्र आताशा दिसते. परंतु, हा प्रश्न आपल्या देशात गेली किमान अडीच दशके विविध ठिकाणी उद्‌भवलेला आहे.

आजच्या झारखंडमधील कोएल कारो धरणाचा प्रश्न १९८०च्या दशकात गाजू लागला. त्या पुढचे, म्हणजे, १९९०चे दशक गाजले-गर्जले ते सरदार सरोवराच्या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न तापल्याने. त्याच्याच जोडीने संघर्ष घडले ते आजच्या उत्तराखंडातील टिहरी प्रकल्पाच्या निमित्ताने. विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून ते आजतागायत हीच चर्चा आता झडताना दिसते ती महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, गुजरात, हरयाना, गोवा यांसारख्या राज्यांतील प्रस्तावित 'विशेष आर्थिक क्षेत्रां'मुळे (स्पेशल इकॉनॉमिक झोन्स - सेझ) तसेच झारखंड, छत्तीसगड व ओरिसा या देशाच्या आदिवासीबहुल पट्ट्यांतील खाण उद्योगांमुळे. स्थल-कालपरत्वे या वादात काही जुजबी फरक दिसत असले तरी यांतील मुख्य आणि कळीचा मुद्दा आहे तो विकास प्रकल्पांमुळे विस्थापित होणा-या लोकसमूहांच्या पुनर्वसनाचा आणि ते पुनर्वसन समाधानकारक पद्धतीने न झाल्याने या जनसमूहांच्यावर लादल्या जाणा-या हलाखीपायी त्यांच्या मूलभूत मानवी हक्कांच्या घडून येणा-या पायमल्लीचा.



नानाविध विकासप्रकल्पांच्या कार्यवाहीपायी विस्थापित व्हावे लागणा-या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आताशा अधिकाधिक प्रकर्षाने मुखर होऊ लागण्यामागे अनेकानेक कारणे आहेत. एक तर, स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षांच्या तुलनेत आजची परिस्थिती खूपच निराळी आहे. विस्थापितांचा प्रश्न तेव्हाही होताच. मात्र, तेव्हा होणारे विस्थापन हे मुख्यतः सिंचन प्रकल्प, धरणे व कालवे यांसाठी केल्या जाणा-या भूसंपादनाशी निगडित असे. त्यामुळे, ग्रामीण परिसर, जंगले व डोंगरमय प्रदेशातील आदिवासी जनजातींपुरताच हा प्रश्न त्या वेळी मर्यादित राही. लोकसंख्याही तेव्हा आजच्या इतपत वाढलेली नव्हती. परिणामी, विस्थापितांचे संख्यात्मक आकारमानही तसे आटोपशीरच असे. आज विस्थापितांच्या समस्येचा व्याप सर्वार्थाने वाढलेला आहे. विकास प्रकल्पांच्या रूप-स्वरूपात प्रचंड वैविध्य आलेले दिसते. धरणे, कालवे, पाटबंधारे यांच्या जोडीनेच वाढते शहरीकरण, घरबांधणी, रस्ते, रेल्वेमार्ग, विमानतळ, वीजनिर्मिती, उद्योगधंदे, खाणव्यवसाय, विशेष आर्थिक क्षेत्रांसारखी विकासाची प्रारूपे... अशा अक्षरशः असंख्य कारणांपायी आज अनेक ठिकाणी विस्थापन घडून येताना दिसते. विस्थापनाचा वेग आणि आकारमान यांत तुफान वाढ झालेली आहे.

वाढणारी लोकसंख्या हा यांतील एक सगळ्यांत कळीचा घटक. वाढत्या लोकसंख्येमुळे ठिकठिकाणच्या घनतेमध्येही भर पडते आहे (एक चौरस किलोमीटर क्षेत्रामध्ये वास करणारी लोकसंख्या म्हणजेच लोकसंख्येची घनता). या वाढत्या घनतेपायी विस्थापितांचे संख्यात्मक आकारमान एकदम वाढलेले आहे. धरणांच्या बांधकामांपायी होणा-या विस्थापितांबाबत अभ्यास करणा-या संशोधकांचे ओरिसाबाबतचे निरीक्षण या संदर्भात उद्‌बोधक ठरते. या अभ्यासकांच्या निरीक्षणानुसार, दर हेक्टरी विस्थापितांची संख्या १९५०च्या दशकात होती अवघी दोन. तर, १९८०च्या दशकात, म्हणजेच १९८०च्या दशकात, हीच संख्या पोहोचली जवळपास सहावर. याचाच अर्थ, दर हेक्टरी विस्थापितांच्या संख्येत तीन दशकांत जवळपास तिप्पट वाढ झाली. येणा-या भविष्यात हेच आव्हान अधिकाधिक कडवे होत जाण्याची सारी लक्षणे दिसतात. संशोधकांच्या आजवरच्या अभ्यासानुसार, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात एक एकक क्षेत्रावर स्वातंत्र्याच्या वेळी अदमासे दहा एक हजार लोक राहत असत. आज एक एकक क्षेत्रात पूर्वीच्या जवळपास चांगली तिप्पट, म्हणजेच, सुमारे तीस हजार माणसे राहताना दिसतात ! पुनर्वसनाबाबतचे विविध प्रश्न दिवसेंदिवस बिकट आणि गुंतागुंतीचे होत जाण्यामागील एक मुख्य कारण हेच दिसते.

## आर्थिक हलाखीचे आठ पैलू

विकासप्रकल्पांच्या कार्यवाहीमुळे प्रकल्पबाधितांना विस्थापित व्हावे लागते आणि त्यापायी त्यांच्या आर्थिक हलाखीत भरच पडते, या विरोधाभासाची तड कशी लावावयाची हा आजचा सर्वांत नाजूक मुद्दा बनलेला आहे. ज्या गरिबीच्या निराकरणासाठी विकासाचा मुद्दा रेटायचा त्याच विकासप्रक्रियेद्वारे काही समाजघटकांच्या दुरवस्थेमध्ये (उदाहरणार्थ, प्रकल्पबाधित) भरच पडते, हा जगभरचाच अनुभव होय. प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाचे प्रयत्न केले गेले तरी प्रकल्पग्रस्तांच्या जीवनमानाचा विस्थापनापायी ढासळलेला दर्जा आणि त्या दर्जाची झालेली हानी सहजासहजी व लवकर भरून येत नाही, असाच जगभरच्या पुनर्वसनाचा निदान आजवरचा तरी अनुभव आहे. प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन आणि पुनर्स्थापनेबाबतचे अनेक उपक्रम हेच सत्य वारंवार समोर आणतात. असे उपक्रम पूर्णतः अयशस्वी ठरल्याने गरिबीची नवनवीन बेटेच जणू अनेक ठिकाणी तयार झाल्याचे दाखले आहेत. सर्वसाधारण सामाजिक-आर्थिक विकास साध्य करण्यासाठी प्रवर्तित करण्यात आलेल्या विकासयोजना प्रकल्पग्रस्तांच्या लेखी विकासाच्या संधी वगैरे मुळीच ठरत नाहीत. उलट, विकासयोजनांच्या अंमलबजावणीपायी विस्थापितांचे जिणे भाळी ल्यालेल्यांच्या हलाखीत भरच पडल्याने गरिबीविरुद्धच्या एकंदर लढ्याचीच पीछेहाट होते, असा अभ्यासकांचा दावा आहे.

विकासयोजनांच्या अंमलबजावणीपायी सक्तीचे स्थानांतर पदरी आलेल्यांच्या आर्थिक हलाखीत भर पडण्यास एकंदर आठ निरनिराळे घटक कारणभूत ठरत असल्याचे जगभरात आढळून आले आहे. स्थळ-काळ-वेळपरत्वे हे घटक आणि त्यांचे तौलनिक महत्त्व अर्थातच बदलताना दिसते. विकासप्रकल्पासाठी करण्यात आलेल्या भूसंपादनात जमीन जाणे, विस्थापनापायी रोजगार बुडणे, निवा-यास मुकावे लागणे, रोजगार बुडाल्याने वा जमीन गेल्याने वित्तीय सीमान्तीकरण होणे (मार्जिनलायझेशन), अन्नसुरक्षा घटणे, अनारोग्याचे प्रमाण वाढणे तसेच मृत्युदरातही वाढ दिसणे, सार्वजनिक मालमत्तेप्रती (उदाहरणार्थ जंगले, पाणी, खनिजे इत्यादी) असणारा 'ॲक्सेस' नाहीसा होणे वा त्याच्या प्रमाणात घट अनुभवास येणे आणि विस्थापनापायी सामाजिक नातेसंबंध व सांध्यांची मोडतोड होणे हे ते आठ पैलू होत. या घटकांचाही विस्थापितांच्या विविध उपगटांवर घडून येणारा परिणाम हा वेगवेगळा असतो. विस्थापितांचे वय, वर्ग, सामाजिक स्तर, लिंग, शिक्षण, व्यावसायिक कौशल्ये, नवनवीन कौशल्ये हस्तगत करण्याची लवचिकता अशा अनेक घटकांवर तो अवलंबून असतो.



साहजिकच, लादल्या गेलेल्या सक्तीच्या विस्थापनापायी विस्थापितांमधीलही विषमतेत भरच पडते, असा अनुभव येतो. स्थानांतराचा तुलनेने अधिक फटका हा विस्थापितांमधीलही त्यातल्या त्यात दुर्बळ घटकांनाच तीव्रतेने बसतो असे आढळून आले आहे. पुनर्वसन असो, विस्थापनापायी मिळणारा मोबदला असो वा विकासयोजनांच्या लाभांचे वाटप असो, विस्थापितांपैकीही अंमळ सुस्थितीत असणा-यांनाच सारे फायदे मुख्यत्वेकरून मिळताना दिसतात. माहितीची असमान उपलब्धता, प्रस्थापितांशी साटेलोटे करण्याबाबतच्या अनुकूलता, व्यवस्थेतील फटींचा लाभ उठविण्याची मानसिकता व संधी, विकासयोजनांच्या आखणी-अंमलबजावणीसंदर्भातील नियोजनात सहभाग...अशा नानाविध आघाड्यांवर विस्थापितांपैकी दुर्बळ घटकांच्या झोळीत विषम दानच घातले जाते. परिणामी, गोरगरिबांच्या मूलभूत मानवी हक्कांची सक्तीच्या स्थानांतरादरम्यान होणारी पायमल्ली हा आता मोठा वादविषय बनतो आहे. त्यामुळे, सार्वजनिक विकासाला चालना देणा-या विकासयोजनांची अंमलबजावणी करत असतानाच प्रतिकूलतेचे वाण पदरी आलेल्यांच्या मूलभूत मानवी हक्कांचे संरक्षण करण्याची कसरत करावयाची, असा दुहेरी पेच नियोजनाच्या प्रक्रियेत आता समोर येतो आहे. विकासयोजनांचे लाभार्थी आणि त्या विकासयोजनांची किंमत चुकविणारे हे दोन्ही लोकसमूह परस्परांपेक्षा बव्हंशी वेगवेगळे असल्याने 'मुखी कुणाच्या पडते लोणी, कुणा मुखी अंगार' या वास्तवाचा प्रत्यय प्रकर्षाने येत राहतो.

सगळ्यात मोठी विस्मयाची बाब अशी की, विकासाद्वारे घडून येणा-या सक्तीच्या विस्थापनाची प्रक्रिया आपल्या देशात गेली सुमारे सहा दशके सतत अस्तित्वात असली तरी, विस्थापितांची संख्या नेमकी आहे तरी किती यांबाबत मात्र अधिकृत आकडेवारी कोठेही हाताला लागत नाही. विस्थापितांच्या न्याय्य पुनर्वसनासाठी झटणारे केवळ चळवळींमधील कार्यकर्तेच नाही, तर, या क्षेत्रात कार्यरत असलेल्या संशोधकांचाही अनुभव म्हणा वा तक्रार म्हणा, हीच आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पाच-सहा दशकांत देशभरात निरनिराळ्या काळात, वेगवेगळ्या ठिकाणी जे जे विकासप्रकल्प साकारले त्यापायी जे सक्तीचे विस्थापन घडून आले त्या प्रकल्पबाधितांची संख्या नेमकी आहे तरी किती, यांबाबतची अधिकृत सांख्यिकी संकलित वा प्रकाशित करणारी यंत्रणाच आपल्या व्यवस्थेत नाही. प्रकल्पग्रस्तांच्या संख्येबाबतची जी काही माहिती अधिकृत सूत्रांकडून मिळते तिच्या यथार्थतेबाबत संशोधकांना शंका वाटते. उपलब्ध आकडेवारीपेक्षा विस्थापितांची वास्तवातील संख्या किती तरी अधिक आहे, असा त्यांचा दावा आहे.

## विस्थापित नेमके आहेत तरी किती ?

विस्थापितांसंदर्भातील समग्र आणि अधिकृत आकडेवारी एक तर उपलब्धच होत नाही आणि उपलब्ध होणारी सांख्यिकी ही विस्थापितांच्या सांख्यिकी आकारमानाचे वास्तव चित्र दाखवत नाही या तिढ्यातून मार्ग काढण्यासाठी अभ्यासकांनी विस्थापितांच्या संख्येबाबतचे आपापले अंदाज तयार केले आहेत. साहजिकच, संशोधक-अभ्यासकांची ही अंदाजित आकडेवारी आणि उपलब्ध होत असलेली अधिकृत आकडेवारी यांत भरपूर तफावत आढळून येते. हाताशी असलेल्या साधनांनिशी संशोधकांनी तयार केलेली विस्थापितांसंदर्भातील अंदाजित आकडेवारी ही अधिकृत सांख्यिकीपेक्षा अधिक भरते. त्यातही पुन्हा, संशोधकांनीच तयार केलेल्या या अंदाजित आकडेवारीमध्येही अलीकडील काळातील नवनवीन संशोधनामुळे, पुनर्संशोधनापायी फेरबदल होत आहेत. विस्थापितांच्या संख्येबाबत संशोधकांनी पूर्वी मांडलेले अंदाजही अ-यथार्थ असल्याने आकडेवारीसंदर्भातील नवीन संशोधनांती ते सुधारून घेण्यात आले.

विकासप्रकल्पांच्या कार्यवाहीपायी देशभरात गेल्या सहा दशकांत घडून आलेल्या सक्तीच्या विस्थापनासंदर्भात संशोधकांनी आजवर केलेल्या अभ्यासातून हाती आलेल्या दोन मुख्य बाबी पुढीलप्रमाणे :

(१) आपल्या देशात गेल्या ६० वर्षांत विविध प्रकारचे जे विकासप्रकल्प उभे राहिले त्या प्रकल्पांपायी विस्थापित झालेल्यांची एकंदर अंदाजित संख्या सुमारे सहा कोटी इतकी असावी.

(२) या एकूण अंदाजित विस्थापितांपैकी एक तृतीयांश विस्थापितांचेही पुनर्वसन झालेले नाही.

हे इथेच संपत नाही. ज्या काही विस्थापितांचे जे काही पुनर्वसन झालेले आहे त्यांतही राज्याराज्यांत प्रचंड तफावत अनुभवास येते. प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाबाबत सर्वाधिक कमकुवत कामगिरी असणारी दोन राज्ये म्हणजे पश्चिम बंगाल आणि आसाम. या दोन राज्यांत आजवर राबविल्या गेलेल्या विकासयोजनांमुळे सक्तीचे विस्थापन पदरी आलेल्या एकंदर विस्थापितांपैकी १० टक्के विस्थापितांचेदेखील पुनर्वसन आजतागायत झालेले नाही. पुनर्वसनाबाबतच्या या सार्वत्रिक हेळसांडीमागे तीन ढोबळ कारणे दिसतात. पुनर्वसनाबाबतच्या सर्वंकष कायद्याचा अभाव, 'पुनर्स्थानांकन' आणि 'पुनर्वसन' यांतील सूक्ष्म परंतु मूलभूत फरकाची जाण नसणे आणि विस्थापितांची गणना समाजातील तुलनेने दुर्बळ, उपेक्षित व मूक घटकांत होणे, ही ती तीन कारणे.



अभ्यासकांच्या मते, सक्तीच्या विस्थापनापासून - खास करून उचित पुनर्वसनाशिवाय केल्या जाणा-या पुनर्स्थानांकनापासून - संरक्षण पुरविणारा सर्वंकष कायदाच आपल्या देशात नाही, हा यांतील आद्य कमकुवत भाग होय. पुनर्वसनाबाबतच्या धोरणाचाही इतकी वर्षे अभावच होता. आता अगदी अलीकडे सरकारने पुनर्वसनाबाबतचे एक धोरण तयार केले आहे. दुसरे म्हणजे, अगदी धोरणकर्त्यांच्या पातळीवरही 'पुनर्स्थानांकन' आणि 'पुनर्वसन' या संज्ञा समानार्थीच गणल्या जातात, असाच अनुभव सर्वत्र येतो. विस्थापितांचे 'पुनर्स्थानांकन' म्हणजे प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या मूळच्या राहत्या जागेवरून हलवून दुस-या जागी निव्वळ नेऊन वसवणे. 'निवा-याचे ठिकाण बदलणे', एवढाच मर्यादित अर्थ यात अभिप्रेत आहे. साहजिकच, 'पुनर्स्थानांकन' ही तशी तात्कालिक, चट्दिशी पूर्ण होणारी कृती असते. 'पुनर्वसन' ही संज्ञा 'पुनर्स्थानांकन' या संज्ञेपेक्षा खूपच व्यापक आहे. पुनर्वसन ही तशी दीर्घ काळ चालणारी प्रक्रिया होय. पुनर्स्थानांकनानंतर नवीन ठिकाणी नेऊन वसवल्यानंतर विस्थापितांनी नवीन वातावरणाशी पूर्णपणे जुळवून घेणे; सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक, वित्तीय, सांस्कृतिक अशा नानाविध बाबतींत नवीन पर्यावरणाशी विस्थापितांची सांधेजोड घडून येणे, या सगळ्या प्रक्रियेच्या माध्यमातून विस्थापनापूर्वीचा जीवनमानाचा दर्जा (त्याच्या संख्यात्मक तसेच गुणात्मक परिमाणांसह) विस्थापितांना नवीन जागेवर पूर्ववत प्राप्त होणे, या सा-या बाबी 'पुनर्वसन' या संज्ञेत अनुस्यूत आहेत. आज मात्र, 'पुनर्स्थानांकन होणे' म्हणजेच 'पुनर्वसन होणे' असा सोयीचा अर्थ काढला जातो. तिसरे म्हणजे, आदिवासी, अल्पभूधारक, अनुसूचित जातींचे घटक, दुर्गम परिसरातील रहिवासी यांसारख्या तुलनेने दुर्बळ लोकसमूहांचाच विस्थापितांमध्ये मुख्यत्वे समावेश असल्याने त्यांचा आवाजही संघटितपणे उमटत नाही. परिणामी, त्यांच्या व्यथांची तड लागणेही दूर राहते.

विस्थापितांसंदर्भातील एका महत्त्वाच्या वर्गीकरणाचाही विचार या सगळ्या चित्रात नजरेआड करता कामा नये. विकासयोजनांचे 'प्रत्यक्ष' अथवा 'थेट' (डायरेक्ट) आणि 'अप्रत्यक्ष' (इनडायरेक्ट) प्रकल्पबाधित विस्थापित असे दोन गट पडतात. विस्थापितांच्या संख्येबाबतची संशोधकांनी तयार केलेली सहा कोटींची ही अंदाजित आकडेवारीदेखील, हे वर्गीकरण ध्यानात घेता, एका अर्थाने अपुरीच ठरते. कारण, ही अंदाजित संख्या आहे ती केवळ थेट वा प्रत्यक्ष प्रकल्पबाधित विस्थापितांची. अप्रत्यक्ष विस्थापितांची तर कोठे गणतीच नाही ! एकूणच पाहता, विस्थापितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न किती गुंतागुंतीचा आहे, याची कल्पना यावरून यावी. ■■

सामाजिक

# स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण

## अपेक्षा आणि वास्तव

भारताच्या राज्यघटनेमध्ये १९९२ साली करण्यात आलेल्या ७३ व्या आणि ७४ व्या दुरुस्तीमुळे शहरी तसेच ग्रामीण भागांतील स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना आणि त्यांची कार्यपद्धती यांत मूलभूत स्वरूपाचे काही बदल घडून आले. अनुसूचित जाती तसेच जमाती आणि महिला या, गावगाड्याच्या कारभारात पूर्वापारच जेमतेम सहभाग असलेल्या दोन समाजघटकांना आरक्षणाची कवचकुंडले लाभल्याने स्थानिक पातळीवरील निर्णयप्रक्रिया तसेच विकासाच्या जडणघडणीत सक्रिय भाग घेण्याच्या वाटा त्यांच्यासाठी प्रशस्त बनल्या. राज्य पातळीवरही स्वायत्त निवडणूक आयोग अस्तित्वात येऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी नियमितपणे घेण्याचे उत्तरदायित्व त्याच्याकडे सोपविले गेल्याने विकेंद्रित लोकशाहीच्या तिस-या स्तरावरील लोकसंस्थांच्या कामकाजाचा कालावधी निश्चित बनला. तर, केंद्रीय वित्त आयोगाप्रमाणेच राज्याराज्यांतही वित्त आयोग स्थापन झाल्याने शहरी तसेच ग्रामीण भागांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय व्यवस्थेचा निश्चित कालावधीने आढावा घेऊन या संस्थांकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या जबाबदा-या व त्यांना उपलब्ध असणारी वित्तीय साधने यांचा मेळ घालण्याबाबतची स्वायत्त यंत्रणाही कार्यरत बनली.

स्थानिक स्वराज्य संस्थांचा रचनात्मक पोत बदलण्याच्या दृष्टीने, या तीनपैकी, सर्वांत महत्वाची ठरते ती आरक्षणाची तरतूद. जात, वर्ण, वर्ग, पैसा, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय लागेबांधे यांसारख्या बाबींसंदर्भात नानाविध प्रकारच्या अनुकूलतांचे लेणे ल्यालेल्या समाजघटकांमध्येच सत्ता व सत्तापदांचे वाटप होण्याची; सत्तेतील वाटा त्यांच्याचकडे प्रामुख्याने जाण्याची आपल्या देशात पूर्वापार परंपरा होती व आहे. परंतु, समाजातील अन्य वर्गांनाही स्थानिक पातळीवरील सत्तासोपानात विविध स्तरांवर प्रतिनिधित्व मिळावे, प्रतिनिधित्वाच्या माध्यमातून त्या त्या स्तरावरील निर्णयप्रक्रियेमधील त्यांचा सहभाग वाढावा आणि या सहभागाचे प्रतिबिंब स्थानिक परिसराच्या विकासासाठी अवलंबण्यात आलेल्या धोरणांमध्ये, विकासासंदर्भात त्या धोरणांमध्ये अंगिकारण्यात आलेल्या प्राधान्यक्रमामध्ये डोकवावे, ही आरक्षणाच्या तरतुदीमागील अपेक्षा.



परंतु, अपेक्षा आणि वास्तव सर्वत्र आणि सदोदित हातात हात घालून चालतातच असे नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रचनेतील गुणात्मक बदलाचे अपेक्षित परिणाम वास्तवात अनुभवास येतात का, अनुसूचित जाती व जमाती तसेच महिलांसारख्या आपल्या समाजव्यवस्थेतील तुलनेने उपेक्षित घटकांचे जे सबलीकरण या नवीन व्यवस्थेद्वारे अपेक्षित आहे ते प्रत्यक्षात घडून येते आहे किंवा नाही, या समाजघटकांचा स्थानिक स्तरावरील निर्णयप्रक्रियेतील सहभाग अर्थपूर्ण ठरतो आहे किंवा नाही... अशा काही कळीच्या प्रश्नांचा जो एक व्यापक अभ्यास देशभरातील १२ राज्यांमध्ये हाती घेण्यात आला त्या अभ्यासाने अपेक्षा आणि वास्तव यांतील तफावत समोर मांडली आहे. ७३ व्या तसेच ७४व्या घटनादुरुस्तीसंदर्भातील कायद्यास संसदेने २३ डिसेंबर १९९२ रोजी जी मान्यता दिली तिला २००२ साली १० वर्षे पूर्ण झाली. हाच मुहूर्त साधून या अभ्यासाचे प्रवर्तन करण्यात आले. विस्तृत अशा क्षेत्रीय पाहणीवर आधारलेल्या या अभ्यासांती डोळ्यासमोर साकारणारे चित्र कोणाही विवेकशील मनुष्यास केवळ अंतर्मुख बनविणारेच नाही तर कमालीचे अस्वस्थ करणारेही ठरावे.

अनुसूचित जाती तसेच जमातींच्या लोकसमूहांचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग वरिष्ठ जातींना अजूनही पचला-रुचला नसल्याचे वास्तव या अभ्यासाद्वारे पुन्हा एकवार ठसठशीतपणे सामोरे येते. परंतु, घटनेचेच भक्कम पाठबळ त्या सहभागाला असल्याने वरिष्ठ जातसमूहांचे काही चालत नाही, त्यांचा जणू निरुपायच आहे असेच सर्वसाधारण चित्र दिसते. त्यामुळे, सामाजिकदृष्ट्या दुर्बळ घटकांची व्यवहारात कोंडी करण्याचे, या लोकसमूहांमधून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा अवमान, उपमर्द, अधिक्षेप करण्याचे वेगवेगळे मार्ग वरिष्ठ जातसमूहांच्या प्रतिनिधींकडून शोधले जातात. ग्रामपंचायतीची बैठक चालू असताना अनुसूचित जातीच्या सदस्य अथवा लोकप्रतिनिधीने खाली जमिनीवर बसावयाचे, मात्र, वरिष्ठ जातींमधून आलेले सदस्य खुर्च्यांवर बसणार असा परिपाठ दिसतो. हरियाना, आंध्र प्रदेश, ओरिसा आणि तामिळनाडूत हे प्रकर्षाने आढळून येते. सरपंचपदी अनुसूचित जातीमधून निवडून आलेली व्यक्ती असेल तर तिने जमिनीवर बसावयाचे. पंचायतीमधील जाट वा तत्सम वरिष्ठ जातींचे सदस्य मात्र खुर्च्यांवर, हे चित्र हरियानात सरसहा दिसते. अनुसूचित जातींच्या लोकप्रतिनिधींचे कप, थाळ्या, ग्लास हे प्लॅस्टिकचे असतात. ते वेगळे ठेवले जातात. हे पुरेसे नाही म्हणून की काय, वापर झाल्यानंतर त्या प्रतिनिधींनी आपापली भांडी विसळूनही ठेवावयाची असतात !

ग्रामपंचायतींच्या कार्यालयीन व्यवहारात जातपात, स्पर्शास्पर्श मोठ्या खुबीने पाळला जात असल्याचेही दाखले मिळतात. ग्रामपंचायतीचा शिपाई उच्चवर्णीय असेल तर तो त्याच पंचायतीमध्ये निवडून आलेल्या अनुसूचित जातीच्या सदस्यांच्या कपबशा विसळण्यास नकार देत असल्याचे ओरिसामध्ये आढळून आले. उत्तर प्रदेशात त्या मानाने परिस्थिती अंमळ बरी आहे. पंचायतीमध्ये निवडून आलेल्या अनुसूचित जातीच्या सदस्यांना तिथे अगदी जमिनीवर बसण्यास जरी भाग पाडले गेले नाही तरी, या प्रवर्गातील सदस्यांसाठी खास वेगळ्या अशा प्लॅस्टिकच्या खुर्च्यांची योजना केलेली असते. कारण, बैठकीचे कामकाज आटोपल्यानंतर या खुर्च्या धुवून ठेवता येतात ! अनुसूचित जातींमधील सदस्यांचा ग्रामपंचायतीसारख्या अगदी तळातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्यक्ष कारभारातील सहभाग कितपत प्रभावी असतो यांबाबतच्या पाहणीचे निष्कर्ष तर अधिकच बोलके आहेत.

उच्चवर्णीयांशी संबंधित काही विषयांवर चर्चा सुरू असेल तर अनुसूचित जातींच्या सदस्यांना विचारप्रदर्शन करण्यास वा मत मांडण्यास मज्जाव केला जात असल्याचे चित्र तामिळनाडू तसेच ओरिसात समोर येते. ग्रामपंचायतींच्या हद्दीतील विकासकामांची आखणी तसेच अंमलबजावणीबाबतही असाच भेदभाव, दुजाभाव दाखविला जातो. अगदी सरपंच जरी अनुसूचित जातीचा असला तरी त्या गावातील अनुसूचित जातसमूहाच्या वस्तीतील शाळेच्या इमारतीची बांधबंदिस्ती सरळसरळ दुर्लक्षिली जाते. परिणामी, या लोकसमूहांमधील मुलांना शेजारच्या गावातील दूर अंतरावर असणा-या शाळेत जाण्याखेरीज पर्यायच उरत नाही. अनुसूचित जातीच्या लोकसमूहांच्या वस्त्यांना जोडणारे रस्ते उपेक्षित राहतात. त्यांच्या देखभालदुरुस्तीबाबत अनास्था दाखविली जाते. नळाने पाणीपुरवठ्याची योजना ग्रामपंचायतीच्या हद्दीत राबविली गेली तर गावातील उच्चवर्णीयांची वस्ती असणा-या भागाकडे पाणी आधी जाते. अनुसूचित जातींमध्ये समाविष्ट असणा-या घटकांच्या कल्याणासाठी ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकातील नगण्य भाग वेचला जाणे, हे चित्रही या दोन राज्यांत आढळून आले.

स्थानिक पातळीवरील निर्णयप्रक्रियेतील अनुसूचित जातसमूहांच्या सहभागाला घटनेनेच अवकाश पुरविलेला असला तरी वास्तवात या लोकसमूहांचा हा सहभाग नाममात्र, कमकुवत आणि किमान परिणामकारक कसा राहील याची तरतूद उच्चवर्णीयांकडून पद्धतशीरपणे केली जात असल्याचेच राज्योराज्यी अनुभवास येते. या साठी केल्या जाणा-या हिकमतींची लहानशी जंत्री केली तरी ती उद्‌बोधक ठरावी.



(१) अनुसूचित जातसमूहांमधील पोटविभागांत कलागती लावून देणे, हा उपाय नेहेमी योजला जातो. यामुळे या जातसमूहांच्या संघटित शक्तीचे विघटन घडून येते. परिणामी, निवडून आलेल्या सदस्याच्या पाठीशी तो समाज एकसंधपणे उभा राहत नाही.
(२) अनुसूचित जातींमधील तुलनेने दुबळा उमेदवारच निवडून येईल याची काळजी घेतली जाते. तशीच व्यवस्थाही केली जाते. अशा दुर्बल उमेदवाराला नंतर अंकित करून घेऊन प्रत्यक्षात कारभार आपल्या हाती ठेवणे उच्चवर्णीयांना सहज शक्य होते.
(३) सरपंचपदी अनुसूचित जातीची व्यक्ती असेल - मग ती व्यक्ती स्त्री असो वा पुरूष - तर उपसरपंच हा हटकून उच्चवर्णीय असतो. साहजिकच, अप्रत्यक्षपणे सत्ता वरिष्ठ जातींच्याच हातात राहते. मागासवर्गीय समाजसमूहांच्या तुलनेत चांगली असणारी शैक्षणिक पार्श्वभूमी, उच्च असणा-या सामाजिक स्तराबरोबर येणारी सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय लागेबांधे, पैसा यांचे पाठबळ असल्याने उच्चवर्णीय व्यक्तीच्या हाती अधिकारांचे केंद्रीकरण होते आणि व्यवस्थेमध्ये ते धकूनही जाते.
(४) वरिष्ठ जातसमूहांच्या हाती सत्तेचे वास्तवातील असे होणारे केंद्रीकरण रोखण्यास अनुसूचित जातसमूह व्यवहारात अयशस्वी होताना दिसतात. सर्वांगीण मागासलेपण, गरिबी, अज्ञान, प्रशासकीय कार्यपद्धतींबाबतची अनभिज्ञता आणि मुख्य म्हणजे वरिष्ठ जातींवर या समाजसमूहांचे असलेले वित्तीय तसेच आर्थिक अवलंबन यांपायी अनुसूचित जातींमधून ग्रामपंचायतींसारख्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सत्ता प्रभावीपणे राबविता येत नाही.

अर्थात, देशात सर्वत्रच असे निराशाजनक चित्र आहे, असे मात्र नाही. सत्तेमधील सहभागास घटनेचे भक्कम कवच लाभलेले असल्यामुळे का होईना परंतु, अनुसूचित जाती तसेच जमातींमधून निवडून आलेल्या प्रतिनिधी-पदाधिका-यांबरोबर मिळते-जुळते घेण्याची वरिष्ठ जातसमूहांची मानसिकता आता हळूहळू दृग्गोचर होते आहे. आंध्र प्रदेश तसेच उत्तर प्रदेशात काही ठिकाणी हा बदलता ‘ट्रेन्ड’ अनुभवास येतो. तुलनेने चांगले चित्र असणारी चार राज्ये म्हणजे महाराष्ट्र, गुजरात, पश्चिम बंगाल आणि केरळ. कम्युनिस्ट विचारसरणीच्या प्रभावापायी पश्चिम बंगाल व केरळमध्ये, महात्मा फुल्यांपासून सुरू झालेल्या जातवर्णविरोधी लढ्यामुळे महाराष्ट्रात तर, अस्पृश्यतेविरुद्ध महात्मा गांधींनी छेडलेल्या संघर्षामुळे गुजरातमध्ये जातिभेदजन्य विषमतेची तीव्रता व्यवहारातून क्रमाने बोथट होत असल्याचे जाणवते. परंतु, अजूनही बराच मोठा पल्ला पार करावयाचा आहे. ■■

राजकीय

# अशीही घराणेशाही राजकारणातील !

'घराणेशाही' हे भारतातील राजकीय व्यवस्था व व्यवहाराचे एक व्यवच्छेदक लक्षण मानले जाते. किंबहुना, घराणेशाही हे काहींच्या बाबतीत राजकीय व्यवस्थेत अधिकारपद चालून येण्याचे अंगभूत 'क्वालिफिकेशन'च ठरते, अशीही टीका आपल्या देशात केली जाते. एखाद्या व्यक्तीचा नैसर्गिक कौल, त्याच्या वा तिच्या मनाची निसर्गदत्त आवड, राजकीय क्षेत्रातील उमेदवारी, राजकारणाची पार्श्वभूमी, शिक्षण, व्यावसायिक अनुभव... यांसारख्या अन्य बाबी लक्षात न घेता, अमूक एका राजकीय घराण्यातील ती व्यक्ती असल्याने तिने घराण्याचा राजकीय वारसा पुढे चालविण्यासाठी राजकारणाच्या क्षेत्रातच उतरले पाहिजे, असा जणू एक अलिखित संकेत म्हणा वा धारणाच आपल्या देशातील मानसिकतेमध्ये रुजलेली दिसते. विशेषतः, निवडणुकांचा हंगाम आला की तर हा मुद्दा अधिकच प्रकर्षाने चर्चेत येतो.

साहजिकच मग सर्वसामान्य माणसाच्या मनात विचार येतो की ही घराणेशाही केवळ आपल्याच देशातील राजकीय व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे की जगाच्या पाठीवरील अन्य देशांमध्येही अशीच घराणेशाही नांदत असते ? समजा, असेलच अशी घराणेशाही तर तिचे स्वरूप आपल्या देशातील घराणेशाहीसारखेच आहे की काही निराळे ? राजकारणाच्या वैश्विक पटलावर झळकणा-या सुमारे पाच हजार राजकीय व्यक्तिमत्त्वांच्या शैक्षणिक, व्यावसायिक पार्श्वभूमीची करण्यात आलेली पाहणी या संदर्भात मोठी मनोज्ञ ठरते. केवळ या धुरिणांचीच पार्श्वभूमी नव्हे तर, देशाच्या राजकारणात उच्चपदस्थ म्हणून जबाबदारीची पदे सांभाळणा-या या व्यक्तींच्या निकटवर्ती वर्तुळात वावरणा-यांची शैक्षणिक व व्यावसायिक पार्श्वभूमीही बरेच काही सांगून जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'हूज हूं'च्या मालिकेत समावेश असणारे राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च नेते, मंत्रिमंडळातील सदस्य, कायदेमंडळांचे सभासद, सर्वोच्च नेतृत्त्वाच्या निकटवर्ती वर्तुळातील सल्लागार अशांचा या पाहणीत अंतर्भाव आहे.

जगभरातील राजकीय व्यवस्थेतही एक प्रकारची घराणेशाही नांदते, असा एक मोठा मजेशीर निष्कर्ष या पाहणीद्वारे हाताशी येतो. मात्र राजकीय व्यवस्थेतील या घराण्यांचे रूप-स्वरूप वांशिक घराण्यांप्रमाणे नसून ते भारतीय संगीतातील घराण्यांप्रमाणे



दिसते, एवढाच काय तो फरक. जगभरातील राजकीय उच्चपदस्थांमध्ये साधारणपणे आठ ते नऊ 'घराण्यां'ची चलती दिसून येते. कायदा, उद्योग-व्यवसाय, राजनीती व परराष्ट्रनीती, लष्कर, पत्रकारिता, अर्थशास्त्र, वैद्यक, शिक्षण व अभियांत्रिकी या नऊ घराण्यांचा जगभरातील उच्चपदस्थ राजकीय नेतृत्त्वात वरचष्मा असल्याचे या पाहणीतील आकडेवारीवरून ध्यानात येते. देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये सर्वोच्च पदावर असलेल्यांची शैक्षणिक वा व्यावसायिक पार्श्वभूमी बघितली तर तुलनेने सर्वाधिक नेते 'कायदा घराण्या'तील असल्याचे दिसते. एकूणांतील सुमारे १८ ते १९ टक्के नेत्यांनी एक तर कायद्याचे रीतसर शिक्षण घेतले आहे वा निवडणुकीच्या माध्यमातून सर्वोच्च सत्तास्थानी आरूढ होण्यापूर्वी ते कायद्याच्या क्षेत्रात व्यावसायिक म्हणून सक्रिय तरी होते. कायदा घराण्याखालोखाल वर्णी लागते ती उद्योग-व्यवसायनामक घराण्याची. एकूणांतील अदमासे १५ ते १६ टक्के राजकीय नेते या घराण्याची पार्श्वभूमी असलेले दिसतात. तिस-या क्रमांकावर घराणे येते ते मुरब्बी राजनीतिज्ञांचे वा आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकीय मुत्सद्देगिरीत 'करिअर' केलेल्यांचे. टक्केवारीच्या भाषेत बोलावयाचे तर या नमुना पाहणीतील उमेदवारांमध्ये या घराण्यातील उमेदवारांचे प्रमाण दिसते साधारणपणे १२ ते १४ टक्क्यांच्या आसपास. चौथा क्रमांक आहे लष्कराचा. लष्करी सेवेची पार्श्वभूमी असलेल्या नेत्यांची एकूणांतील टक्केवारी १० ते ११ टक्क्यांच्या परिघात आहे. लष्कराखालोखाल माहात्म्य आहे ते पत्रकारितेच्या घराण्याचे. पत्रकारितेचे शिक्षण वा पार्श्वभूमी असलेल्यांचे एकूणांत प्रमाण दिसते सात ते आठ टक्क्यांचे. ही पाच घराणी म्हणजे घराणे परंपरेतील जणू बुजूर्गच. त्या खालोखाल संख्यात्मकदृष्ट्या जवळपास एकाच स्तरावर असणारी उर्वरित चार घराणी म्हणजे अर्थशास्त्र, वैद्यक, शिक्षण आणि अभियांत्रिकी. या चार घराण्यांची तालीम घेतलेल्या नेत्यांचे एकूणांतील प्रमाण साधारणपणे पाच ते सहा टक्क्यांच्या जवळपास असल्याचे नमुना पाहणीतील सांख्यिकी सांगते.

देशोदेशीच्या नेतृत्वात विविक्षित घराण्यांची जी सद्दी अनुभवास येते तिचा संबंध अनेक बाबींशी असतो, असे या क्षेत्रातील अभ्यासकांचे निरीक्षण सांगते. त्या त्या देशाचा इतिहास, देशोदेशीची सांस्कृतिक जडणघडण, लोकमानसाचा कल व आवडीनिवडींबाबतचे प्राधान्य, त्या देशाने साध्य केलेली विकासाची पातळी अशा नानाविध बाबींवर त्या त्या देशातील राजकीय व्यवस्थेत कोणत्या घराण्याची सद्दी असते वा चालते हे बव्हंशी अवलंबून राहते. आफ्रिका खंडाचे उदाहरण या संदर्भात

विलक्षण बोलके ठरते. लोकशाहीप्रधान राज्यप्रणाली सुदूर न रुजलेल्या, बहुतांशी अशांत अशा या संपूर्ण परिसरातील देशांमध्ये राजकीय उच्चपदस्थ हे सर्वसाधारणपणे लष्करी उठाव करूनच सत्तापदी आलेले आहेत. साहजिकच, आफ्रिकी नेतृत्वात वरचष्मा दिसतो तो लष्कर घराण्याचा. सुदान, इथिओपिया, रवांडा या देशांची नावे इथे आठवतात. लष्करी स्वरूपाचा उठाव करून सिंहासन हाती घेणारे हे लष्करशहा मग आपल्या वर्तुळात पूर्वाश्रमीचे लष्करी अधिकारी, लष्करी सेवेतील आपले मित्र व सहकारी यांचाच कटाक्षाने भरणा करतात. राजकीय व्यवस्थेमधील लष्कर घराण्याचे बस्तान या पद्धतीनेच यथावकाश दृढ होत जाते. केवळ आफ्रिकेतच हे चित्र दिसते असेही समजण्याचे कारण नाही. ब्रिटनमध्ये राजकीय उच्चपदस्थांच्या श्रेणीबद्ध रचनेत सद्दी चालते ती ऑक्सफर्ड व केंब्रिजमधील नातेसंबंधांची. परंपरा, संस्कृती, संकेत, पिढीजात चालीरीती यांचे पावित्र्य जोपासणा-या चीनमध्ये उच्च राजकीय व्यवस्थेत समावेश करून घेण्यापूर्वी त्या त्या व्यक्तीची पूर्वपीठिका, तिचे कौटुंबिक लागेबांधे, तिच्या घराण्याचा इतिहास, चिनी व्यवस्थेत त्या घराण्यातील पूर्वसूरींनी बजावलेली कामगिरी यां सारख्या बाबींकडे आवर्जून लक्ष दिले जाते. त्यांची नोंद घेतली जाते.

देशोदेशीच्या राजकीय व्यवस्थेमध्ये उच्चपदांवर जबाबदारी पेलणा-या धुरिणांची शैक्षणिक वा व्यावसायिक पार्श्वभूमी आणि त्या त्या देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये त्यांच्या घराण्यातील उमेदवारांचे संख्यात्मक प्राबल्य यांचा इथे साकारणारा आलेख मोठा चिंतनीय आहे. शिक्षण, उद्योग-व्यापार, प्रशासन, राजनीती व परराष्ट्रनीती, अर्थशास्त्र, अभियांत्रिकी, कायदा, वैद्यक व लष्कर ही नऊ घराणी व यांपैकी एकाही घराण्यात अंतर्भाव नसलेले सगळे 'अन्य' या घराण्यात असे वर्गीकरण केले तर देशोदेशीचे उभरणारे चित्र मोठे उद्‌बोधक ठरते. उदाहरणार्थ, भारतातील राजकीय व्यवस्थेमध्ये तुलनेने सर्वाधिक भरणा आहे तो 'अन्य' या वर्गातील उमेदवारांचाच ! गंमत म्हणजे या बाबतीत ब्राझीलही भारताच्या जोडीला आहे. अमेरिकेत वरचष्मा दिसतो तो कायद्याची पार्श्वभूमी असलेल्यांचा. त्या खालोखाल तिथे प्राबल्य जाणवते ते व्यापार घराण्याचे. चीनमध्ये प्रभाव आहे तो अभियांत्रिकीची पार्श्वभूमी असलेल्या राजकारणी धुरिणांचा. अभियांत्रिकीच्या पाठोपाठ तिथे आहे प्रशासन आणि लष्कर. इजिप्त आणि दक्षिण कोरियात वर्णी लागते ती लष्करी सेवेमधून राजकारणात आलेल्यांची.

देशाच्या राजकीय व्यवस्थेत सर्वोच्च पदी विराजमान झालेल्या नेत्याच्या शैक्षणिक वा व्यावसायिक पार्श्वभूमीचा पगडा या संदर्भात बराच मोठा असल्याचे



जाणवते. अमेरिका व चीन या उभय देशांतील विद्यमान नेतृत्वाचेच उदाहरण विलक्षण बोलके आहे. बराक ओबामा हे कायदा घराण्यातील असल्याने त्यांच्या वर्तुळात समव्यावसायिकांचा, कायदेविषयक शिक्षण देणा-या ज्या संस्थांमध्ये ते शिकले तेथील सहाध्यायींचा अंतर्भाव प्रामुख्याने दिसतो. तर, चीनमध्ये अभियांत्रिकी घराण्याचा ठसा दिसतो कारण विद्यमान अध्यक्ष हू जिन्ताओ, त्यांचे पूर्वसूरी जिआंग झेमिन, सध्याचे पंतप्रधान वेन जिआबाओ यांच्यासह पॉलिट ब्यूरोच्या स्थायी समितीत असलेल्या नऊ सदस्यांपैकी आठ सदस्य हे अभियांत्रिकीचे पदवीधर आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणाती अमेरिकेचा भांडकुदळेपणा आणि पायाभूत सेवासुविधांच्या निर्मितीबाबत चीनने गेली सुमारे तीन दशके लावलेला धडाका यांचा आणि त्या त्या देशांच्या राजकीय धुरिणांची पार्श्वभूमी यांच्या आंतरिक नात्याचा हा परिपाक म्हणायचा का ? ■■

## निवेदन

'अर्थबोधपत्रिके'मध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधनपर लेखन भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीकडे सादर करण्याकडे अलीकडील काळात कल वाढलेला दिसतो. जाणकार, विचक्षण वाचकांना 'पत्रिके'बाबत वाटणा-या आत्मीयतेची, 'अर्थबोधपत्रिके'च्या विश्वसनीयतेची, संशोधनपर वाचनसाहित्याला वाहिलेले गंभीर प्रकृतीचे एक नियतकालिक या 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रतिमेची जणू पावतीच त्याद्वारे मिळते. मात्र, अशा या लेखनसाहित्याचा अंतर्भाव 'पत्रिके'च्या अंतरंगात करण्यास आम्ही असमर्थ आहोत, याबद्दल सखेद दिलगिरी व्यक्त करण्याखेरीज पर्यायही नाही. एक तर, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत कार्यरत असलेल्या संपादकीय विभागाने खास 'अर्थबोधपत्रिके'साठीच तयार केलेल्या मजकुराखेरीज अन्य मजकूर अंकात अंतर्भूत करावयाचा नाही, असे धोरण संस्थेने 'पत्रिके'च्या प्रारंभापासूनच जपलेले आहे. तसेच, देश वा राज्य पातळीवरील प्रचलित विषयांचा ऊहापोह करणारे संशोधनपर लेखन प्रकाशित करणारे संशोधनविषयक नियतकालिक, असे 'अर्थबोधपत्रिके'चे स्वरूपही संस्थेस आरंभापासूनच अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रकाशन हेतूने संस्थेकडे सादर करण्यात येणारे लेखन स्वीकारण्यास आम्ही असमर्थ आहोत. 'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणारे वाचक संस्थेची ही भूमिका समजावून घेतील, त्याबाबत त्यांचा कोणताही विपरित ग्रह होणार नाही, अशी आशा नव्हे तर खात्री आहे. लोभ आहेच तो उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

### प्रमुख संदर्भ

(1) National Geographic April 2009 (2) Nature, Vol 457/12 February 2009 (3) Prospect, April 2009, (4) Japan Echo, February 2009 (5) The Economist, 18-24 April 2009 (6) http://www.cs.toronto.edu/ (7)http://findarticles.com/p/articles/(8)http://www.russianembassy .org/(8) http://www.mospat.ru/(9)http://news.bbc.co.uk/2/hi/ uk_news/politics/ (10) http://www.guardian.co.uk/politics/2009/ (11) Walter Fernandes, Sixty Years of Development-induced Displacement in India, Scale, Impacts and the Search for Alternatives, India Social Development Report 2008, Development and Displacement, Cuncil for Social Development, Oxford University Press, New Delhi, pp. 89-102 (12) Inclusion and Exclusion in Local Governance, Field Studies from Rural India, B.S. Baviskar, George Mathew (Ed.), Institute of Social Sciences, Sage Publications, New Delhi. ■■


## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

**'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी**

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.





**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन**
**आता पुनर्मुद्रित स्वरूपात**

**भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज**

# Poverty in India

**लेखक**

वि.म. दांडेकर    नीळकंठ रथ

पृष्ठे १४०    किंमत : २००/- रुपये

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध स्तरांतील वाचकांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**( १ जून २००६ पासून)**

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८०/ - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)